म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२३५०

REFBK-0008080
REFBK-0008080

## मोठ्यांचीं मनोगतें–

### प र्ण कु टी

कन्यादानापासून तान्हुलीसपाहून पर्यंतचा लेखिकेनें आलेखिलेला संसाराचित्रपट हृद्य आणि स्वसंवेद्य आहे, या प्रस्तावनाकारांच्या मताशीं सहसा कुणाचें दुमत होणार नाहीं...वासल्य हा लेखिकेचा आवडता रस दिसतो."

—स्त्री (मासिक)

"बडोदें येथील प्रसिद्ध कवयित्री सौ. अपर्णा देशपांडे यांच्या निरनिराळ्या ८३ काव्यपर्णांची ही पर्णकुटी असून प्रत्येक काव्यपर्णांत सौजन्य, भावना, मोहकता नि मार्मिकता दिसते. वेष्टनहि फार आकर्षक आहे."

—भारत मित्र, रिवण गोवा.

# निवारा



# अर्पण पत्रिका



माझ्या निवाऱ्याच्या उभारणीला

ज्यांनीं रुपेरी सहाय्य केलें

त्या श्री. सौ. मा. महाराणी शांतादेवी

यांचे चरणीं

**'नि वा रा'**

सादर समर्पण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ६०८०

नम्र,

(सौ.) अपर्णा देशपांडे

१-१-१९५३.

# अंतरींचं गुज....

अंतरींचं गुज एक। रसिक हो! तुम्हां साठीं
नाहीं विद्वत्ता विस्तार। नाहीं कांहीं आटापीटी ॥

शीण भागोटा प्रवासीं संसाराच्या जरी आला।
उन्ह झळा किंवा दाह केव्हां असह्यचि झाला।
निवाऱ्याला निःसंकोचें जरा बैसा, घ्या विश्राम।
माझें कौलारू खोपट येथें कैचा ऐषाराम॥
घोंट थंड पाणीयाचा, वर वाऱ्याची झुळूक
अंथरिली चऊघडी वर टेका क्षण एक॥
जरा लागतांच डोळा क्षणभरी उल्हासाल
आणि बघतां बघतां थंड होई सायंकाल॥
मंद तेवते समई देवीपुढें माझ्या एक
पहा तेथें नवलाव! लावी कमला तिलक।
दीपकळी मंद लास्य करी हांसत डोलत
अहो भाग्य! तिला लाभे थोरा मोठ्यांची दौलत
माझ्या दीपकळीसाठीं दिली सोन्याची समई
निवाऱ्याला माझ्या तेणें लाखमोल शोभा येई
सोनीयाची ही समई कमलेच्या कृपें लाभे
'रौप्य-सुवर्ण'-मिलाप कुसरीला मन लोभे
याच शोभेसाठीं तरी खास लोभावून मन
थोडे थबकाल येथें अंतरांत संतोषून
आणि घेतां निरोपाला ओठीं उमटेल कौतूक
तेंच सुख, समाधान, तेंच मानीन सार्थक

—सौ. अपर्णा देशपांडे

# निवारा

[ काव्यसंग्रह ]

आणि

# नवीं मंगल गीतें

[ मंगल कार्यांत म्हणण्यायोग्य गाणीं ]

REFBK-0008080

कवयित्री :

सौ. अपर्णा देशपांडे, बी.ए.

मूल्य दीड रुपया

कवयित्री व प्रकाशिका :
सौ. अपर्णा देशपांडे, बी.ए.
बाबाजीपुरा, बडोदें

मुखपृष्ठावरील चित्र श्री. पेडणेकर यांचें आहे.

सर्व हक्क कवयित्रीचे स्वाधीन.

[ बडोदें, ता. १-१-५३ ]

मुद्रक :
श्री. कृ. बा. मराठे, बी.ए.
श्रीरामविजय छापखाना
बडोदें.

# इत इतः ।

साधी पण सुबक अशी 'पर्णकुटी' सौ. अपर्णाबाईंनीं आपल्या काव्य-देवतेसाठीं पांचसहा वर्षांपूर्वींच उभारलेली रसिकांच्या स्मरणांत आहेच. त्या पर्णकुटींत 'निवारा' लाभलेली त्यांची प्रतिभा आज काव्यप्रेमी वाचकांच्या पुढें ठाकली आहे.

नवनवोन्मेषशाली, कल्पनेचे तरल पंख लावून नेत्राच्या एका उघडझांपींत पृथ्वीवरून उड्डाण करून गगनाला गवसणी घालणारी व फक्त कवीच्याच ज्ञानचक्षूंना दिसणाऱ्या दिव्य भासांना रम्य नामरूप देणारी,–हें कवीच्या प्रतिभेचें लक्षण व वर्णन खरेंच. विद्युल्लतेच्या लखलखाटाची दीप्ति कोणीच नाकारणार नाहीं; पण स्नेहानें किंचिन्मात्र सूत्राला लगटून एका तेजस्स्फुलिंगाच्या साहाय्यानें प्रगटवलेल्या दीपकळीचें तेज आपल्या प्रसन्न सोज्ज्वलतेनें रसिकाला मोहिनी घातल्याशिवाय राहाणार नाहीं. सौ. अपर्णाबाईंच्या प्रतिभेचें तेज दीपकळीसारखें शांत स्नेहाळ व राजीव आहे. विश्वाच्या व्यापाराचा खटाटोप त्यांच्या प्रतिभेनें मांडला नसेल पण आपल्या जिव्हाळ्यानें मानवी जीवनाला, विशेषतः स्त्री जीवनाला तिनें खचित वेंधून घेतलें आहे. ज्या 'अपौरुषेय' वाङ्मयाचें आपण आजकाल त्यांतील भाबड्या भावना व त्या भावनांचा सहजसुंदर आविष्कार याबद्दल कौतूक करतो, त्याच 'अपौरुषेय' वाङ्मयाचा एक सुसंस्कृत प्रकार सौ. अपर्णाबाईंच्या काव्यांत आढळतो. आंग्ल वाङ्मयांत ज्याप्रमाणें जुन्या Ballads च्या धर्तीवर एकुणिसाव्या शतकांतील कवींनी Literary Ballads लिहिलीं व तीं स्वागतार्ह ठरलीं, त्याचप्रमाणें मराठी काव्यांतील हें आधुनिक "अपौरुषेय" वाङ्मय रसिकांना खास रुचेल.

'अपौरुषेय' गीतांतला जिव्हाळा, गोडवा व अभिजात विनोद यांचा उत्तम परिपाक सौ. अपर्णाबाईंच्या काव्यांत झाला आहे. स्त्री जीवनामध्यें कन्या, भगिनी, पत्नी, माता अशा निरनिराळ्या भूमिका जिव्हाळ्यानें व उत्कटतेनें सजवतें, त्यांचीं विविध चित्रें तितक्याच उत्कटतेनें व मधुरपणें

सौ. अपर्णाबाईनीं आपल्या कवितांत चितारलीं आहेत. " आज माझ्या घरीं बीज " मध्यें—

चोळी भावाच्या मायेची । नसो मखमली भरगच्ची
मृदु प्रेमाचें प्रतीक । त्याचें मोल नवलाख

या ओळींत प्रकट झालेली बहिणीची भावावरली निर्व्याज ममता; तसेंच

थंड झाला स्वयंपाक । दारीं बोलतसे काक
जीव होतसे बावरा । आला कां न माझा हिरा ?

या ओळींतील, भावाला थोडा उशीर झाल्यामुळें मनांत दाटलेली कातरता:

दिनीं भाऊबीजेच्या या । रुसला कां भाई राया ?
काय आगळीक झाली । माया पातळ रे केली ?

यांतील अतिस्नेहाच्या पोटीं उद्भवलेली " पापशंका ";

याचें मखमलीचें मन । त्याला नको देऊं शीण

अशी काकुळतीनें वहिनीला केलेली आळवणी–या सर्वांमधून बहिणीच्या मायेचें किती प्रेमळ व गोड चित्र वठलें आहे !

मातेच्या हृदयांतील आपल्या बाळांबद्दलचें प्रेम, कौतुक व अभिमान तर अनेक कवितांतून ओसंडतांना दिसेल. " गोऱ्या गालीं ग याच्या काजळ लाव " या कवितेमध्यें तरुण, अननुभवी मातेचें अत्यंत मुग्ध व मनोज्ञ दर्शन होतें. " शल्य " मधील ' आई मी काय घेतला कणि कोंड्यास " असें विचारीत गोरामोरा होणारा गोजिरा, बुजरा ससा हा वत्सल मातेच्या कौतुकांतूनच निर्माण झाला आहे, गरीब आईचा आपल्या गुणी मुलांबद्दलचा अभिमान,

पटकूर माझें थिटें । लाजवील शालू शेले
पदराच्या खालीं याच । माझे हिरे मी झांकीले
सखयांनों लखलाभ । तुम्हां कानींच्या हिरकण्या
माझ्या संसार नभांत । दोन चमकती चांदण्या

या ओळींत किती प्रखरपणें पण किती हृदयंगमपणें प्रगट झाला आहे !

" जीवनमंदिरा जा " या कवितेंत आईची पाखर सोडून आपल्या जीवन-मंदिरीं निघालेल्या राजस बाळीची पाठवणी करतांना आईच्या हृदयांत उभवलेला भावनांचा कल्लोळ वर्णिला आहे. "एक समाधान" यामध्यें संसाराचा बिकट शकट हांकीत असतांना विश्रांतीचें स्थान होऊन राहिलेला ध्येयाचा सांगाती मिळाल्या-बद्दल संसारदक्ष पत्नीचा समाधानाचा निश्वास आहे.

" रिकामी मी कोठली " यामध्यें चाखलेली कवयित्रीची मिस्किल विनोद-बुद्धि " वरमाईचें मनोराज्य " या कवितेमध्यें पुन्हा भेटून मनाला आल्हाद देते. ताशीव तोड्यापासून नगगोंडेपर्यंत दागिने घडवून " सूनमुख " करायाला उत्सुक झालेल्या वरमाईला, नटनटींच्या नखरेलपणानें सपत्नीक बापू सामोरा आलेला पाहून केवढा निराशेचा न आश्चर्याचा धक्का बसला असेल !

या संस्कृत गीतांमध्यें स्त्रीच्या जिव्हाळ्याचा परिसर विस्तृत झालेला आढळेल. " अपौरुषेय " गीतांतील स्त्रियांचे जग आपले घरकूल, आपलीं रक्ताच्या नात्याचीं माणसें व फारतर सोयरेधायरे व शेजी एवढेंच असे. आजच्या युगांत व काव्यांत स्त्रीच्या मायेची, कौतुकाची व अभिमानाची पाखर राष्ट्र व त्यांतील वीरपुरुष यांच्यापर्यंत रुंदावली आहे. " राष्ट्रवीरांना पंचारती " " हिंद लक्ष्मीस ", " हे अमोल हीरक मम सदनीं " या कवितांत कवयित्रीचें राष्ट्रप्रेम उत्कटतेनें प्रगटलें आहे. आपल्या अपत्यांइतकाच, आपल्या पदरा-खालच्या हिऱ्यांइतकाच तिला राष्ट्राच्या " जवाहिराचा " व " धीर वीर रणरागिणी "चा अभिमान व कौतूक आहे.

सौ. अपर्णाबाईच्या काव्यांत प्रकट झालेलें जग असें वात्सल्यानें, सौहार्दानें व सात्त्विक भावनांनीं ओथंबलेलें आहे. निरागस हृदयांतील शुद्ध आनंदाचीं व समाधानाचीं कारंजीं त्यांच्या काव्यांत थुईथुई उडत आहेत. त्यांत विषादाला नैराश्याला जागा नाहीं. पण क्वचित् आपल्या घरट्याच्या उंबेबाहेर डोकावतांना जगांतील विषमता, दीनांची ठायीं ठायीं होणारी गांजणूक व त्यांना मिळणारा उलटा न्याय पाहून कवयित्रीचें हळुवार हृदय काचते, उबगते व

जरी ऐसेंच व्हायाचें, जग बुडो एकदांचे
ऐशा जगाचा निर्माता, कोण म्हणे तया त्राता
(जगा न्यारा तुझा न्याय)

असे वैतागाचे उद्गार मुखांतून निघतात; 'दग्ध हृदय"; "जोडीदारास" या कवितांतूनही नैराश्याचे, वैफल्याचे सूर ऐकूं येतात. पण एकंदरीनें पहातां कवयित्रीचा जीवनविषयक दृष्टिकोण आशावादी, समाधानी आहे. सांपडतील तेवढे, परिश्रमपूर्वक आयुष्यांतील समाधानाचे सुवर्णकण वेचावेत व जीवनानंद द्यावाघ्यावा असें सौ अपर्णाबाईचें जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे.

"नवी मंगल गीतें" हा काव्यांतील एक नवा प्रकार लक्ष वेधण्याजोगा व स्वागतार्ह आहे. आपल्या लग्नपद्धतीमध्यें कित्येक समारंभ मोठे गोड व अर्थ गंभीर आहेत. त्यांना अनुलक्षून वेळोवेळीं म्हणावयाच्या गोड ओंव्या जुन्या, वडील बायकांच्या तोंडीं आहेत. पण कालमानानें विस्मरणाच्या फेऱ्यांत सांपडून त्या ओंव्यांना अर्थशून्य, ओबडधोबड व तुटक स्वरूप आलेलें आढळतें. सौ. अपर्णाबाईनीं लग्नसमारंभांत कांहीं गोड विधी निवडून त्यांना आपल्या गोड, वत्सल गीतांची जोड दिली आहे. घाणाभरणी, मातृभोजन, सुनमुख, वगैरे गीतें फार मधुर, प्रसंगोचित व वास्तवदर्शी आहेत.
" घरभरणी " मधील

ऋद्धिसिद्धि घरा येई । हिच्या पुण्य पावलांनीं ।
झाकेल घर माझं । सोनीयाच्या कवलांनीं ॥
कुलवंताची ही बाळ । माझं उजळील कुल ।
सत्यवानाची सावित्री । घालीं ज्ञानवंता भूल ॥
साधी भोळी राधाराणी । पोरां थोरां रमवील ।
मधु प्रीतीची बांसरी । संसारांत ऐकवील ॥

या ओळीं सुसंस्कृत सद्भावनांचा व सहजरम्य भाषाशैलीचा अप्रतिम नमुना आहेत. आजकाल आप्तरचित मंगलाष्टकें घरोघर म्हटलीं जातात. पण सौ. अपर्णाबाईचीं व्रतबंध व विवाह या समयीं म्हणावयाचीं मंगलाष्टकें फारच प्रसादपूर्ण, अर्थगंभीर व नादमधुर आहेत.

सौ. अपर्णाबाईनीं काव्यदेवतेच्या पूजनासाठीं भरलेल्या तबकाचें हें असें स्वरूप आहे. वरील वर्णनावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं आपलीं फुलें

निर्गंध म्हणून, आपल्याला "भिकारी" असें शेजारच्या रातराणी शेवंती हेटाळतील ही त्यांची "कवितेस" या कवितेंत उच्चारलेली भीति अस्थानीं व केवळ विनयमूलक आहे. श्रीशारदेच्या अर्चनासाठीं त्यांनीं गुंफलेला हा पुष्पहार जसा नानाविध सुमनांनीं भरगच्च आहे, तसाच त्यांतील सुमनांच्या रूपगुणगंधानें कोणत्याहि ऐटबाज गुलाबनिशिगंधाला मागें सारील असा आहे. श्री शारदेच्या कृपेनें सौ. अपर्णाबाईच्या प्रतिभेचा फुलोरा असाच अखंड फुलो व रसिकांना उच्च काव्यानंदाचा सतत प्रत्यय मिळवून देवो.

। शुभं भवतु ।

—सौ. कमळाबाई टिळक

बडोदें.

# ग्राहकांसाठीं थोडेसें —

'पर्णकुटी 'नंतर माझ्या प्रौढ-काव्याचा 'निवारा' हा दुसरा संग्रह अनेक अडचणींतून निघून आज रसिकांच्या सेवेस सादर होत आहे. त्यासंबंधीं मला थोडासा खुलासा करावयाचा आहे. कागदांच्या महर्गतेमुळें एकाच पृष्ठावर दोन दोनहि कविता लिहाव्या लागल्या आहेत. एरव्हीं त्या विरळपणें लिहून पृष्ठसंख्या मला फुगवितां आली असती. तेव्हां बुकसेलर्स व ग्राहक यांनीं ही गोष्ट अवश्य ध्यानांत घ्यावी. काव्यसंग्रह विकत घेऊन वाचण्याइतकी उदारता अद्याप आपल्या वाचकांत आली नाहीं. त्यामुळें काव्यसंग्रहाला ग्राहक बेताचेच. त्यांतून पुस्तकाची किंमत वाजवी पण थोडी सुद्धां जास्त असलेली चालत नाहीं असा अनुभव आला म्हणून, कागदहि जाड व अधिक महागाचा वापरतां आला नाहीं या दोन्ही दृष्टीनें संग्रहाच्या उणेपणाकडे ग्राहकांनी व विक्रेत्यांनीं समजुतदारपणें बघावें एवढी विनंति आहे.

निवाऱ्याला ज्यांनीं आपुलकीनें सहाय्य केलें त्या सर्वांत श्री. सौ. महाराणीसाहेब व प्रस्तावना लेखिका सौ. कमलाबाई यांच्या बरोबर चित्रकार व मुद्रक यांचा मी विशेष कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतें.

बडोदें, १-१-५३.

सौ. अपर्णा देशपांडे

सं. नं. ३०५
१२३५०

# अनुक्रमणिका

## निवारा


| नांव | पृष्ठ |
| --- | --- |
| १ कवितेस | .... १ |
| २ पंचारति तुजला वीरा | .... २ |
| ३ वरमाईचें मनोराज्य | .... ३ |
| ४ दग्ध हृदय | .... ४ |
| ५ जोडीदारास | .... ५ |
| ६ गोऱ्या गालीं ग याच्या काजळ लाव | .... ६ |
| ७ जीवनमंदीरा जा | .... ७ |
| ८ व्यर्थ सुमा ! तव विकसन आंत-आंत | .... ८ |
| ९ एक समाधान | .... ९ |
| १० मागणें | ....१० |
| ११ विज्ञान आणि कविता | ....११ |
| १२ गुरुदक्षिणा | ....१२ |
| १३ शल्य | ....१३ |
| १४ हिंदलक्ष्मीस | ....१४ |
| १५ दिनराज अंगणीं उदेला | ....१६ |
| १६ हे अमोल हीरक मम सदनीं | ....१७ |
| १७ रक्षाबंधन | ....१८ |
| १८ जगा न्यारा तुझा न्याय | ....२१ |
| १९ करा दिवाळी ! करा दिवाळी ! ! | ....२२ |
| २० आज माझ्या घरीं बीज | ....२४ |
| २१ सरितेस | ....२६ |
| २२ माझी संपदा | ....२८ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| २३ सेवा ! | ....२९ |
| २४ सरस्वतीच्या दरबारांत— | ....३० |
| २५ पाळणा | ....३१ |
| २६ रंजित राधा | ....३२ |
| २७ देवा ! तुझ्या कृपेवीण.... | ....३३ |
| २८ सृष्टीचें सौंदर्य दर्शन | ....३४ |
| २९ भारत मातेस अष्टांग वंदन | ....३५ |
| ३० उपेक्षित ऊर्मिला | ....३७ |
| ३१ असा धन्य उद्गार वाचेस यावा | ....४१ |
| ३२ सखे देतसे इशारा | ....४४ |
| ३३ नव काव्य आणि मातेचें मनोगत | ....४५ |
| ३४ त्रिवारधन्या लेखनि झाली | ....४७ |


---

## नवीं मंगल गीतें


| | |
|---|---|
| १ घाणा भरणी | .... ३ |
| २ मंगलाष्टक (व्रतबंधाचें) | .... ४ |
| ३ मंगलाष्टक (विवाहाचें) | .... ६ |
| ४ मातृभोजन | .... ७ |
| ५ विहिणीस | .... ८ |
| ६ व्याही मंडळीस | .... ९ |
| ७ सूनमुख | ....१० |
| ८ नववधूचें मनोगत | ....११ |
| ९ घरभरणी | ....११ |
| १० मंगलारति | ....१२ |
| ११ दोहद | ....१४ |
| १२ अंगाई गीत | ....१६ |
| १३ मंगल मनीषा | ....१८ |

## १ कवितेस :—

[ चाल :-जगा तुझी सारी तऱ्हा... -यशवंत. ]

देवि ! तुझ्या पूजनाची केलिसे तयारी ॥ धृ० ॥

तुझ्या मंदिराला थोर ।
चालले हे सान थोर ।
मन माझें हेकेखोर ।
ध्यास घेउनीया तुझा तुजला हांकारी ॥ १ ॥

नाहीं सोबती सांगाती
रातकिडे 'किर्र' गाती
वाटमोर चोर किती
मार्ग आडवीती माझा, रात्र ही अंधारी ! ॥ २ ॥

कशीबशी झालें धीट
तुझ्या दिठीवरी दीठ
घेउनीया आलें भेट
कुणी हिणवीती परी म्हणुनी भिकारी ॥ ३ ॥

फुलें कण्हेरी जास्वंद
मग कोठचा त्यां गंध
हांसतील निशीगंध
गुलाबाचे गेंद आणि चाफे हे सोनेरी ॥ ४ ॥

शेवंती ही ओळखींची
रातराणी शेजारींची
ऐटबाज दृष्टी त्यांची
जणूं खुणावीती मातें, 'जा कशी माघारी' ॥ ५ ॥

आतां येतील पुजारी
धाकें त्यांच्या भय भारी
मागतील खास द्वारीं
लाच, दक्षिणा वा 'पास' शिफारसी भारी ॥ ६ ॥

जरी राउळीं ना आलें
वेडि खुळी कोणां भ्यालें
माउली ! मी परी धालें
तुझी प्रेरणा अंतरीं, कोण तिथें वारी ? ॥ ७ ॥

## २ पंचारति तुजला वीरा !

[ चाल :–जब तुमहि चले परदेस... ]

किति साहुनि अतुल क्लेश, सेविला देश, अपुला प्यारा, पंचारति तुजला वीरा !

किति वादळ-वारे सोशियले
किति नाविक अगणित हे गेले !
परि किनारिं लाविलि नाव राखिलें नांव, साहुनी कारा ॥ पंचारति ॥ १ ॥

वज्राहुनि कठिण मनानें या
झेलिलेस आघातां राया !
सहचरी-मधुर प्रेमास मातापितयास मुकोनी धीरा ! ॥ पंचारति ॥ २ ॥

हें खांचाखळग्यांनीं भरलें
वैराण पसरलें रान भलें
व्याघ्राचा जबडा क्रूर, अघोरी नूर, चहुंकडे सारा ॥ पंचारति ॥ ३ ॥

पंचाननि घेउनि ही झेप
उडविलीस जगताची झोप
कांटेरि मुकुट शीर्षास, बांधिले खास पदरिं अंगारा ॥ पंचारति ॥ ४ ॥

घुमविण्या शांतिचा पडसाद
जग घालितसें तुजला साद
‘ शांतिदूत ’ जगिं सन्मान, अर्पिला मान, भारता न्यारा ॥ पंचारति ॥ ५ ॥

सिंहासन करुनी मंडित हें
तळपतें जवाहिर ‘ पंडित ’ हे
‘ जयहिंद ’ ! राष्ट्र वीरास करीत सुहास, भगिनिगण सारा ॥ पंचारति ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. नं.
स्थळ प्रत

## ३ वरमाईचें मनोराज्य

[ चाल :-मैत्रिणिनों सांगू नका...सारखी ]

शेजिबाइ ग ! कुठला वेळ बसायला ॥ ध्रु ॥

सोन्याच्या पावलीं
अंबाबाई पावली
मुली लागल्या सांगून यायला ॥ १ ॥

बिंदि बिजवरा कमरपट्ट्याचा
ताशिव तोडे सर मोत्याचा
दिधलं नग गोंडे मी घडायला ॥ २ ॥

घरांत बांधूं दोन खण नवे
जिथें तिथें दीप विजेचे हवे
लक्ष्मि घरभर हवि न फिरायला ? ॥ ३ ॥

पहिलें वहिलें कार्य आमुचें
तशांत पडलों अम्हि गोताचे
ईश कृपा, नच मोल हौसेला ॥ ४ ॥

बापू अमुचा गुणी तशांत
मर्यादेचा फारच शांत
येइल पुण्याहुन आज उद्यांला ॥ ५ ॥

पहा समोरुन येत कोणसे
फाजिल कुठचे नटी नट जसे
नखरे असले नको पहायला ॥ ६ ॥

चला, जाउं द्या, कोण ? अरेच्या !
बापू ? अन् या कोण ? कुणाच्या ?
"सून तुझी, आलों पायां पडायला" ॥ ७ ॥

## ४ दग्ध हृदय

[ जाति प्रणयप्रभा-चाल :-मधु घटाचि... ]

कां गौरविशी मज व्यर्थ बरे ! या दग्ध हृदयिं कोठून हिरे ? ॥

हृदयाचा जरि कुबेर होतो
भणग भिकारी ठरवी जो तो
ऋणको केवळ उरलों रे ! तो
कां गणुं मी वेडें जग सारें ? या दग्ध हृदयिं कोठून हिरे ॥ १ ॥

फुलविलिं सुमनें एकें समयीं
ज्योतिर्मय पाजळली समई
लुटिला सौरभ, तेज कुणीही
तम मंदिरिं आतां भयाण रे ! या दग्ध हृदयिं कोठून हिरे ॥ २ ॥

वसंतिं पढलों प्रीती--पाठ
ग्रीष्मीं छाया दिधली दाट
विभवभरांतहि नव्हतो ताठ
वठला परि आतां वृक्ष अरे ! या दग्ध हृदयिं कोठून हिरे ॥ ३ ॥

परतुनि सुहृदा जाई गेहा
रत्नहार कुणि पुरा करिल हा
नव चैतन्यें जा अन्य गृहा
कोळसाच येथें भरुनि उरे ! या दग्ध हृदयिं कोठून हिरे ॥ ४ ॥

# ५ जोडीदारास

[ चाल:-मागुं नका ग ! तुम्हां सांगतें मंगळसूत्र मला-आफळे ]

थांब गड्या ! रे पुन्हां सांगतों, थांब जरा....तुजला ।
ओढ अशी ही घेऊं नकोरे ! नको अरे ! काचला गळा ॥ ध्रु ॥

अधींच जूं हें अवजड भलतें, धनी बेगुमान
त्यांत तुझी ही अवखळ धडपड रक्ताळून गेली मान
काल पासुनी वैरण दाणा कुठें अम्हां पुरता दिधला ? ओढ अशी... ॥ १ ॥

जपुन जरा हां ! असा सहचरा, अशीच ठेव गती
गाडी अपुली उतरण उतरत, त्यांत चिखल भिजुनी माती
धुम् धारा वर्षाव, गारठा नसोनशीं पुरता खिळला ॥ ओढ अशी.... ॥ २ ॥

देइं नजर-हो अशीच प्रेमळ, मधुन मधुन ठेवीं भान
बसू देत कोरडे, घडें हें रोजच, होइं न बेभान
मार्ग कांपिला अर्धामुरधा जोर राहिला नच पहिला ॥ ओढ अशी... ॥ ३ ॥

घुंगुर खुळखुळ वाजति मंजुळ रमविं जरा त्यावर जीव
संथ साजणा ! पंथ चालना, मुळीं न करुं दे कुणि कींव
अविचारी गतिनेंच तुझ्या या गळतिल आंसू घळा घळा ॥ ओढ अशी.... ॥ ४ ॥

मित्र जरा मी तुजला ढवळ्या ! जुपलों जरि दुबळा
बोल बोलतों परिस अनुभवी देतिल तुजला खचित बळा
ऐक जुटीचा हो, न तुटीचा, प्रवास सुखकर हा अपुला ॥ ओढ अशी.... ॥ ५ ॥

## ६ गोऱ्या गालीं ग याच्या काजळ लाव

[ चाल :–' माहेरचा समोर गांव ' सारखी ]

मोहक गोड माझ्या बाळाचं नांव । गोऱ्या गालीं ग याच्या काजळ लाव ॥ धृ० ॥

राजसाच्या जावळांत
बिजवऱ्याचं मोति खुलतं
आणि इवल्या त्या मुठींत
स्वर्गसुखाचं भरलं पोतं

निर्मळ हास्य कसं घेइ हृदीं ठाव । गोऱ्या गालीं ग याच्या काजळ लाव ॥ १ ॥

संबंधी आप्त यायचे
वानुनि गुण किति चिमण्याचे
मज पुसतील काय बाळाचं नांव ? मोहन नांव मोहन नांव मोहन नांव ॥ २ ॥
अंगावरी कटि खांद्यावरी
घेउन मिरविन दारीं, घरीं, मंदिरीं
तान्ह्याचा नाहीं ग मला सराव, काजळ लाव ॥ मोहक.... ॥ ३ ॥
जादूगिरी खास जादूगिरी
अनुकारिलि गं बाळानं खाशी स्वारी
जिंकील जगतास नयनींचा भाव, याच्या नयनींचा भाव, याच्या नयनींचा भाव॥
काजळ.... ॥ ४ ॥

## ७ जीवनमंदीरा जा

[ चाल :- माझीया माहेरा जा.... ]

जीवनमंदीरा जा ! राजसे ! जीवनमंदीरा जा ॥ ध्रु. ॥
दिला तुझ्या सोबतीला ! दिलाचा ग हा दिलदार
वाटें खरचाया आहे नाणं तुझं ही कल्दार
आइची पाखर
सायीची साखर
करीं न गाजावाजा, राजसे ! जीवनमंदीरा जा ॥ १ ॥
मायेची, जिचीया पाठीं नी पोटीं
घातली सईला तियेच्या ओटीं
भाग्याची साक्षात् माय गिरिजा ॥ जीवनमंदीरा जा ॥ २ ॥

अंगणांत जाईजुई
बहरल्या तुझ्या बाई
नित्य राखाया प्रफुल्ल
प्रेमाचें त्यां पाणी देई
अशोक विस्तारला, निगा राखावी तयाची
नित्य हसूं खेळूंनीया साउलीला त्याचे याची
तुझी ग कलिका
पावे पुष्पसुखा
सांग कागदांत राजसे ! तुझ्या,....एवढा निरोप माझा ॥ जीवन ॥ ३ ॥

## ८ व्यर्थ सुमा ! तव विकसन आंत-आंत-आंत !

[ जाति :–शुभवदना ]

उंच मान करुनि जरा येइ उजेडांत
व्यर्थ सुमा ! तव विकसन आंत-आंत-आंत । धृ ॥

कांटेरी झुडपांनीं
घेरियलें चहुंकडुनी
पर्णभार तुज दडपुनि, मिरवितो जगांत ॥ १ ॥

अंधारीं अर्धस्फुट
फुलणें, हें कां जीवित?
खचित न हा ईश हेत, जाण तूं मनांत ॥ २ ॥

जातीनें कोमल तूं
कठिण करी मन परंतु
दुखवतील क्षण तंतू । परि टळेल घात ॥ ३ ॥

धीट न होशील जरी
गुणवंता ! गति न बरी
संगत ही कांटेरी, आणिल गोत्यांत ॥ ४ ॥
पूर्ण विकसुनी तेजीं
आग मुखावर तेजी
भरुनी घे विश्वाची भव्यता मनांत ॥ ५ ॥
मधुकर रसपान करो
मुदित पतंगहि विचरो
सुफलित जग उत्कर्षे गाउ यशोगीत ॥ ६ ॥

## ९ एक समाधान

[ जाति :–शुभवदना ]

चिंता चिरकाल चिरी चहुंकडुनी मान
परि पुलकित करि जीवा एक समाधान ॥ धृ ॥
कष्टांची गठडिं कितीं
लटकति नजरेभंवतीं
आकांक्षा नित गाती करुण करुण गान ॥ परि० ॥ १ ॥
अविचारी निंदांची
गांजणूक मन जाची
ऐटहि दों दिवसांची नित करि अपमान ॥ परि० ॥ २ ॥
क्षण उसंत नाहि जिवा
ऋतु वसंत हरपावा
ग्रीष्मच निशिदिनिं ठावा दे जणुं सैतान ॥ परि० ॥ ३ ॥

भाव-द्विज किलबिलाट
मन-हय करि थयथयाट
संसृतिचें जूं मुकाट ही लववी मान ॥ परि० ॥ ४ ॥

ध्येयाचा सांगाती
सुखद अशा एकांतीं
गहिवरुनी निभ्रांती स्कंधिं निरवि मान
हेंच जिवा पुलकित करि एक समाधान ॥ ५ ॥

## १० मागणें

[ वृत्त :-अभंग ]

नाहीं जिव्हेला लगाम । आणि घेती तुझें नाम !
नेत्रीं सदाच अंगार । तव दर्शना अधीर !

आत्मस्तुतीला भुकेले । कर्ण कीर्तनीं लावीलें !
हस्तिं कर्म अमंगळ । आणि घेती करीं टाळ !

मनीं विषयांची घाण । करीतात तुझें ध्यान !
टाळवेना एक भूक । आणि उपास-कौतूक !

दीनगांजणूकीं चूर । म्हणवीती दानशूर !
कीटलें अपार मन । अट्टाहासें तीर्थस्नान !

ऐहिकांची मना व्याधि । आणि लाविती समाधी !
करूनीया ऐशी भक्ती । देवा ! कैशी मागों मुक्ति !!

# ११ विज्ञान आणि कविता

[ वृत्त :—भुजंगप्रयात ]

" कुठें चालली बाइ ! तूं गे अशी ही
वितानीं तुझी दृष्टि ही व्यर्थ पाहीं
अधःपात होईल लागून ठेंच
कथीतों, पहा वर्तमानास, हेंच "

" नमस्कार ! भाई ! तुम्ही वंद्य थोर
तुम्हावीण सारें जगत् अंधकार
प्रतापास ऐकोनिया आपुलीया
खरी लाजतें आपुल्या मी मनीं या ॥ "

" नसें यांत शंका तिलप्राय काहीं
जगीं एक विज्ञान हें सत्य बाई,
जळो तें तुझें सत्य कीं स्वप्न काय
गती कुंठिता मानवाची न काय ?

[ वृत्तः—शिखरिणी ]

खरें भासें चित्ता तव वचन, तें मात्र वितथ
अरे नेशी विश्वा प्रलयिं. त्यजुनी खास सुपथ
नरें भक्षावें कां असुनि नर रे ! हाय अनुजा ?
न नीती ही माझी, मम पथ दुजा, जाइं ! दुरि जा ! !

ग्रंथ संग्रहालय ... क्र. १५... २३।१०।५३

# १२ गुरुदक्षिणा

(गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांच्या ९० व्या वाढदिवशीं अर्पिलेली)

[वृत्त :–पृथ्वी]

(१)

किती बहरल्या सुपुष्पबहरें इथें मल्लिका
सुगंध बहु वांपिर्ती अमित रोपिल्या वल्लिका !
निकुंज सुमवाटिका कितिक शोभवीती लता
अहा ! कवण धन्य हा, मुदित त्यांसि संस्कारिता ?

(२)

अबोलि मधुमालती, बकुल जाति शेवंतिका
सुरंगि अमला चमेलि, तुलसीहि कोरंटिका
तयीं नवतऱ्हा करून सजवीत या मालिका
उदारहृदयी, गभीरवदनी कुणी माळि कां ?

(३)

विहार हरिणी करी गतभया जियें आश्रमीं
तृषार्त किति पक्षिगी विरमती इथें सुश्रमी
अथांग करुणार्णवें हृदय व्यापिलें निर्मल
तपोधन कुणी करी तपचि हा मनें वत्सल !

(४)

चहूंकडुनि वेष्टिला गजबजाटलेलें गृह
वरान्न नव अर्पिती करुनि कन्यका आग्रह
कुणी स्तविति, सेविती कुणि; सहाय्य त्यातें करी
सुभव्य कुळिंचा कुणी विलसतो पिता हा तरी ॥

(५)

सुतेज वदनीं वदे ऋषिमुनींस जी थोरवी
स्वकार्यरतता रवि प्रकटवी इथें मानवी
शताब्द सुकृता! गुरो! करित राहिं अंगीकृतें
कृतज्ञ मनिं वाक्सुमेंच गुरुदक्षिणा अर्पित.

## १३ शल्य

[ चाल :-कशानं बाइ झाला, कुगी ग बाइ केला सारखी ]

कशानं गोरामोरा, कोमेजला मोगरा, बाळा तुझा मधु चेहरा ॥ धृ ॥

बागुलबोवा दाविला किं कुणि बाळाला माझ्या ?
उंदिर मामा पळाला किंग मारित असतां ज्या ?
कुणी लपविली शिटीविटी वा चेंडुदांडु बाजा ?
चांद नभींचा ढगाळला ग जणुं गोरा गोरा ॥ बाळा... ॥१॥

डोळुल्यांतली कमल पाकळी करी उघडझांप
मधुनी मधुनी फुंदतो सखा लागुनिया धाप
केविलवाणी नजर जिवाचा उडवी थरकांप
पाहतां पाहतां मंद जाहला शुक्राचा तारा ॥ बाळा.... ॥२॥

कुठें चिमुकली खळी ग लपली आतां इतुक्यांत ?
गालावरची लालि पळविली कुणि हातोहात ?
मालिन्याची मिठी बैसली गुंतवुनी हात
कुणी दुखविला लोभसवाणा गुलाब हा हंसरा ॥ बाळा... ॥३॥

सांग सांग मम राजा! कलिजा माझा तूं साच!
बोल झडकरी कोण पाखरा माझ्या करि जाच?
कुणी रोखुनी नजर मारिला बाण पाडसास?
विंधिला ग कुणि ससा गोजिरा, लाजरा नि बुजरा ॥४॥

बालमनाची शांत जाहली तळमळ निमिषांत
विसावलेलें हृदय जागलें होउनि निभ्रांत
ऊन पावसाचा तो झाला खेळ क्षणार्धांत
वदे, "आई मी काय घेतला कणि कोंब्यास? खरा? ॥५॥

## १४ हिंदलक्ष्मीस

[ जाति :–प्रणयप्रभा ]

'जयहिंद', तुला लक्ष्मी! साचा। तूं स्वाकारचि गत लक्ष्मीचा* ॥ धृ ॥

नेलें त्वां अबलत्व लयाला
थोर शौर्य किति अल्प वयाला
अरिवरि मिळवुनि पूर्ण जयाला
तडफदार वदुनी निज वाचा ॥ तूं स्वाकारचि.... ॥ १ ॥

महिलाजीवन पुरुषी बाणा!
साहुनि रिपुच्या द्विविधहि बाणा
परमुलखीं कंठुनी जीवना
केलास धन्य भव महिलांचा ॥ तू स्वाकारचि... ॥ २ ॥

---

* झांशीवाली लक्ष्मीबाई.

लाथ हाणुनी क्षुद्र भवा या
देशहितास्तव कार्य कराया
शिणविलास सुकुमारा काया
करवाल करीं, कसला काचा ॥ तूं स्वाकारचि... ॥ ३ ॥

कार्य कथी दुस्तर ' नेताजी '
लक्ष्मी-स्मृति लुप्ता करि ताजी
अनुसरिलें त्या कथुनी 'हां जी'
होवुनी स्वार दिधल्या टाचा ॥ तूं स्वाकारचि.... ॥ ४ ॥

घेवुनि हातिं सतीचें वाण
उभविलेंस तें क्रांतिनिशाण
जिवंत केले जन--पाषाण
फोडिला बांध तो दास्याचा ॥ तूं स्वाकारचि.... ॥ ५ ॥

विजयालक्ष्मी भगिनी ज्येष्ठा
ही लक्ष्मी जयहिंद कनिष्ठा
कार्य भिन्न परि एकचि निष्ठा
वाढवूं मान भारतभूचा ॥ तूं स्वाकारचि.... ॥ ६ ॥

राजकारणीं महिला शक्ति
दावुनि दुर्जन दर्प दुरुक्ति
असत्य केली या नव जगतीं
आदर्श खरा हा अबलांचा ॥ तूं स्वाकारचि.... ॥ ७ ॥

अमर युती ही होवुं भारतीं
अमर अशी गर्जेल भारती
मंगलमय ओवाळुं आरती
दिन भाग्याचा, दिन भाग्याचा ! तूं स्वाकारचि.... ॥ ८ ॥

# १५ दिनराज अंगणीं उदेला

[ चाल : घनश्याम नयनिं आला सारखी ]

दिनराज अंगणीं उदेला । सख्यांनो जाऊं चला पूजनाला ॥ धृ ॥

विहंगमांची मंजुळ किलबिल
शुभ सरितेचा निवांत झुळझुळ
गडे साथ या तिला । सयांनो जाऊ चला पूजनाला ॥ १ ॥

फुलली खुलली सुमनवाटिका
मधुप करिति हे म्हणुनि दाटि कां ?
गडे जपुनि या चला । सयांनों जाऊं चला पूजनाला ॥ २ ॥

अगइ ! कशाचा सुटत वावटळ
अंतरिं उभवी मध्येंच खळबळ
सांभाळुं नीरांजनाला ! सयांनों जाऊं चला पूजनाला ॥ ३ ॥

सुहासिनी ही विकसत नलिनी
क्षणभर निरखूं विहरत पुलिनी
गुज कथुं मनिचें तिला । सयांनो जाऊं चला पूजनाला ॥ ४ ॥

भयाकुला ही वंगवासिनी
ही कुणि दुसरी थरकत हरिणी
चला शांतवूं तिला । सयांनों जाऊं चला पूजनाला ॥ ५ ॥

व्याघ्र व्याध कुणि दिसतां नयनीं
क्षणींच बनुं या मग रणरागिणि
कसूं कंबरा चला । सयांनों जाऊं चला पूजनाला ॥ ६ ॥

गडे ! घ्या आतां करिं पंचारती
वीरवरां ओंवाळुं आरती
सर्वेंच जयहिंद बोला । सयांनो, जाऊं चला पूजनाला ॥ ७ ॥

## १६ हे अमोल हीरक मम सदनीं

[ अर्थात् हिंदभूचा अभिमान ]

तन्मूल्य कसें वानूं वदनीं ? हे अमोल हीरक मम सदनीं ॥
पृथ्वी-मोलहि पडेल कमती
विराजती सम्राट-किरीटीं
लोभें यांच्या कितीक झुरती
झगडले ययांस्तव किति कदनीं । हे अमोल हीरक... ॥ १ ॥
कोहिनूर त्यां मधील गेला !
गेला कसला हिसकुनि नेला !
तुटला हो तुटला मम झेला !
परि अन्य चमकले तमांतुनी । हे अमोल हीरक.... ॥ २ ॥
तेजाळचि हा एक सुनिर्मळ
म्हणति 'जवाहिर' असलें दुर्मिळ
नवलचि हें सुमनापरि कोमल
काठिण्य लव न रत्नहि असुनी ।....हे अमोल हीरक.... ॥ ३ ॥
हा दुसरा शोभेलचि ' राजा '
हीरक याविण खुटेल साजा
वैजयंतिच्या लोपवि तेजा
यापुढें अन्य ते कांचमणी । हे अमोल हीरक....॥ ४ ॥

'प्रसाद' प्रभुचा हा 'राजेंद्र'
ऐट बघुनि लाजेलहि इंद्र
आशा आकांक्षांचें केंद्र
हा आशा दीपवि मम नयनीं। हे अमोल हीरक ॥ ५ ॥

बघुनि म्हणत या मन 'सावर कर'
तेज प्राशुनि जणुं रत्नाकर
अंदमानिं या दडवी सत्वर
निस्तेज जाहला वज्रमणी ! हे अमोल हीरक ॥ ६ ॥

इकडे हा चमकतो 'बाळ'सा
उज्ज्वल कीर्त ययाची परिसा
अष्टपैलु, मम खचित दिलासा
हा 'खेर' दैव गतिची म्हणुनी। हे अमोल हीरक ॥ ७ ॥

वानूं आणिक किती तरी हो !
भाग्य पदरिं म्हणुनी हा लाहो
काय उणें मजला बोला हो !
मी खचित खचित हो रत्नखनी ॥ हे अमोल हीरक ॥ ८ ॥

## १७ रक्षा-बंधन !

[ १९४७ ला बिहारमध्यें पं. जवाहरजी गेले असतां तेथें एका हतभागी भगिनीनें त्यांना राखी बांधून हृदयाच्या भाषेंत मांडलेली ही स्वत:ची कैफियत ]

[ जाति–राजहंस ]

ही आर्त हांक ऐका जी ! पंडितजी बांधा राखी ॥ ध्रु० ॥

फाटतो ऊर सांगाया । ना उरला अंगीं त्राण ।
कथु काय हाय ! दीना मी ! कंठाशीं आले प्राण
तो विषार भिनला अंगीं ! ! लागला जिव्हारीं बाण
ध्या हातीं हीच कट्यार
शुभ करीं झणिं करा ठार !
हें जिणें जळो ! लाचार ! ! !
भगिनीच्या शीला राखी ! पंडितजी........................॥ १ ॥
पति लढतां लढतां पडले ! मम जिवलग जिव साचार !
त्या सैतानें...बाबूजी...लाडकाहि केला ठार ! !
गेलें हो गेलें सारें, ना उरलें मज घरदार !
सकल ही सोडिली खंती
परि एक राहिलें अंतीं
विनवितें धरुनि तृण दंतीं
मज भिक्षा ही घाला कीं। पंडितजी...................॥ २ ॥
सुखरूप करित होतें हो । मी गरिबीचा संसार ।
आनंदी जीवन माझें मी । गणिलें जीवितसार ।
कधिं तिलप्राय हो भाई ! घातला न कोणा भार !
परि दैव गतीचा फेरा !
उलटला गरगरा सारा ! !
सुखजीवनिं पडत निखारा ! ! !
राहिलें न काहीं बाकी । पंडितजी.......................॥ ३ ॥
नरराक्षस सेना आली,, आरोळ्या मारित क्रूर !
काफिर कों काटों साले ! बीभत्स गर्जना थोर
मोकाट सांड सुटलेले । डरकाळ्या फोडित फार

लाजा कोळुनि प्यालेले !
कीं नशा करुनि आलेले !
कीं कामाग्नी गिळलेले !
त्यां पुढें काळ मुख झाकी । पंडितजी...........॥ ४ ॥

कथुं कसा ? कोणत्या तोंडें ? तो हाय ! थोर आकांत
कापिले तरुण, म्हातारे, कोवळे कोंभ निभ्रांत ।
किति अनाथ अबला लुटिल्या, शीलाचा केला घात !
ही द्वादशवर्षा बाला—
कौमार्यी पडला घाला
अत्याचारें भ्रम झाला
ही सतत निजमुखा झांकी । पंडितजी..............॥ ५ ॥

ती तिकडे रडते एक, तिज शोक प्रिय बाळाचा ।
एकुलता होता एक । आधार तिच्या जीवाचा ।
कांपिला तिच्याच पुढयांत...चरचरा फणस–कीं साचा ॥
आंतडीं काढिलीं शस्त्रें ।
भिजविलिं रक्तानें वस्त्रें ॥
तिजपुढें विचकितीं वक्त्रें !
तिज ओढिलि धरुनी नाकीं । पंडितजी..............॥ ६ ॥

काय पुढें केलें...छे छे ! ! जिव्हाहि घेत माघार—
कथण्यास अशुभ, येवोंना रिपुवरि प्रसंग कठोर
नर मुखें न वदवे ऐसा–स्त्री मुखें न हाहाःकार
लोपली कुठें हो नीति
थैमान करीत अनीती

कीं षंढ भारतीं उरतीं ?
गणवेश व्यर्थ का खाकी ? पंडितजी..................॥ ७ ॥

छे ! नको ! ! पुसा ते अश्रू ! तुम्हि वीर जवाहिर साचे
धर्माज्ञेनें बांधियले वीर बाहु ऐसे तुमचे
मज हृद्गत कळविति सारे ते नीरबिंदु नयनींचे !
तो एकच शब्द ' बहेन '
मज पुरे पटवितो खूग
परि असंख्य मजसम दीन
विनविती " पुसा काळोखी " । पंडितजी...........॥ ८ ॥

## १८ जगा न्यारा तुझा न्याय !

कळेना रे ! कसा काय । जगा ! तुझा न्यारा न्याय !
गांजणूक दीनापाठीं । पोटासाठीं आटाआटी
घांस सुवर्णाचे खाय । देतां दीनांपोटीं पाय !
सत्य रक्षणार्थ बोला । बैसलाच खासा टोला !
फटकळ, बोलभांड । ऐसें रचीती कुभांड ॥ १ ॥

खोटें बोलूनी सावध । जगीं ठरे साळसूद !
हृदयांत हलाहल । परी ओठीं गोड बोल !
त्याची होतसे वाहवा । तोच साऱ्यां हवा हवा !
सत्य नीतीचे रक्षिते । जग तयांना भक्षीतें ॥ २ ॥

लेकरांच्या हितासाठीं । रात्रंदिनीं माय कष्टी
लोह-आघात बोलांचे । झली हृदय फुलांचे

राग लोभ माया भार । एक्या वेळीं करी फार
ऐसें असूनी " हा थोर । म्हणे तमक्याचा पोर " ॥ ३ ॥
न कळतही कुणाचें । मन दुखावी ना साचें
दयामय मृदू मन । चित्तीं अहंकारही न
जग म्हणे त्या पुचाट ! । चाणाक्षांचें जग भाट
कारस्थानीं काळीं मनें । त्यांना वाहती सुमनें ॥ ४ ॥
खरे शांतीचे जे वादी । जग तयां नित्य निंदी !
संयमाची पराकाष्टा । भोगीते हाल अपेष्टा !
बोंब मारिती उलटी । त्यांच्या थोपटती पाठी !
सत्य संयम अहिंसा । तिथें नानाविध हिंसा ॥ ५ ॥
न्याय जगाचा उलटा । कांपी मन लटा लटा
प्रभो ! तुझ्याही घरींचा । काय हाच न्याय साचा !
जरी ऐसेंच व्हायाचें । जग बुडो एकदांचें !
ऐशा जगाचा निर्माता । कोण तया म्हणे त्राता ॥ ६ ॥

## १९ करा दिवाळी ! करा दिवाळी ! !

[१९५० ची दिवाळी]

करा दिवाळी, करा दिवाळी । होळी कसली ? खरी दिवाळी ॥
नकारघंटा करी ठणाणा
तरि समृद्धी मनानें म्हणा !
उत्साहाला ओढुनि आणा
ठेवा मरता स्वतंत्र बाणा
दिसते जरि ही काळी काळी । तरी दिवाळी ! खरी दिवाळी ॥

जुन्याच पगत्या खरडुनि काढा
जाळुनि भाजुनि झटका झाडा !
स्नेहाविण जरि देह कोरडा
वाती मन–पीळाच्या जोडा
हंसवाच बळें मुखें काजळी । करा दिवाळी करा दिवाळी ॥

सं. नं. 9724

मुलां लेकरा हणुनि धपाटे
पिळुनि तयांचे गाल गोमटे
भात मागतां काढा चिमटे
अन् घेण्याला शिकवा नमतें
अनारिसे अन् करा कडबुळीं । करा दिवाळी करा दिवाळी ॥

खुशाल वाढा पतिस डालडा
दुग्धावरच्या साई काढा
मुलें मागतां या कडु काढा
चहा म्हणा त्या, अन् घृत जोडा
फेणि चिरोट्यांसाठिं तें मुळीं । करा दिवाळी करा दिवाळी ॥

कसलें घेउनि बसला ‘ गोड ’
खावीं केळीं कच्चीं दोड
राताळ्याच्या वाढा चकत्या
निष्कलंक ताटीं चकचकत्या
नकोच चांदी या तिलांजली । करा दिवाळी करा दिवाळी ॥

खराच हितकर अपणां गूळ
गूळ म्हणोनिच खा ढेकूळ
परि डोक्यांतुन काढा खूळ

साखरेविना अडे न चूल
तोळा तोळा मिळे निराळी । करा दिवाळी करा दिवाळी ॥

कोंड्याचे जर मांडे होती !
तर चकल्यांची काय गोष्ट ती !
फारच पौष्टिक लाल जोंधळा
माळवी गहू वातुळ मेला
जळो,साहिबा द्या त्याचा बळी । करा दिवाळी करा दिवाळी ॥

कशाला हवें वस्त्र हो नवें
साधि राहणी थोर मन हवें
मुलांस फिरु द्यां उघड नागवें
आरोग्याला तेंच मानवें
चंद्रमौळि दैवतें आपुलीं । करा दिवाळी करा दिवाळी ॥

नैवेद्यास्तव काढा जीव
कर्तव्याची गांठा शींव
खुशाल करणारे करुं कींव
वहा संसृतीचें राजीव
राजी राखा काळा भैरव, महर्गता चामुंडा काळी
करा दिवाळी करा दिवाळी ॥

## २० आज माझ्या घरीं बीज

सरेना ग माझें काज । आज माझ्या घरीं 'बीज'।
उत्साहाला आलें तेज । आज माझ्या घरीं बीज ॥ धृ० ॥

जन्मोजन्मींची पुण्याई । प्रेम भावंडांचें बाई !
मना लाभाया विसावा । भाऊ प्रीतीचा असावा ।
एका पाठीराख्या कृष्णा । मनीं स्मरोनीया कृष्णा
जगीं भावाबहीणींचें । नातें धन्य करी साचें
मुलें लेकरें संपत्ती । जिवलगही सांगाती
माझ्या मनाचा उद्गाता । भाऊ प्रेमळ जाणता
चोळी भावाच्या मायेची । नसो मख्मली भरगच्ची
मृदु प्रेमाचें प्रतीक । त्याचें मोल नवलाख

× × ×

सखे ! वाट किती पाहूं । माझा येईना कां भाऊ ?
गेला टळूनीया वेळ । कां ग इतुका हा वेळ ?
थंड झाला स्वयंपाक । दारीं बोलतसें काक
जीव होतसे बावरा । आला कां न माझा हिरा ?
रत्नांचा तो काय केवा । भाऊ तेजस्वी असावा
कां न आला माझा साज । आज माझ्या घरीं बीज ॥
दिनीं भाऊबीजेच्या या । रुसला कां भाई राया ?
काय आगळीक झाली । माया पातळ रे केली ?
विसंबलास कासया । आला कां न भाई राया
गुंतलास कोण्या काजीं । काय झाली इतराजी
राणीच्या डोहाळ्यासाठीं । काय गेला दूर हाटीं ?
नको वहिनी ग रुसूं । कोण सलेल तें कुसूं !
याचें मख्मलीचें मन । त्याला नको देऊं शीण
किती नाजुक मनाचा । जरी लोखंडी देहाचा
धरीन मी तुझे पाय । दुरावी न दूध साय

पसरीन पदराला । जरी अपराध झाला
पाठवावा पतिराज । आज माझ्या घरीं बीज ॥

× × ×

शिणावले बाई पाय । घालुनीया येरझारा
भाचे हांकारितीं मामा । नेत्रां लागल्या हो धारा
आले आले भाईराज । आणा ! जिंकली ना पैज ?
दूर शिवेशीं दीसला । आला भाईराज आला
सुरूं होई माझी चेष्टा । " फळ आलें केल्या कष्टा " !
हें हो काय केलें भाई ? किती शिणवावी ताई
करूं आम्हीं गोड शिक्षा । लाडू दुप्पटीनें भक्षा "
" परी आधीं सांग मला । वेळ इतुका कां झाला ? "
लाजे उत्तरतां भाई । " तुझी भाची झाली ' ताई '
तुझ्या साठीं आलो आज । आज माझ्या घरीं बीज ॥ "

## २१ सरितेस–

[ चाल :–मुद्रिके अग चरपते ! ]

( हरिद्वारच्या गंगौघास उद्देशून )

अघहरिते ! सरिते ! कुठे जाशि सांग तें, निशिदिनीं तूं
मज सांग तुझा हेतू ? ॥ धृ ॥
थांबशी कुठें ना कशी ? जाशि स्वैरशी ! अगे ! स्त्री तूं !
मनिं ये न कसा किंतू ?
मोकाट चालशी वाट, तरु घनदाट, धांवसी तूं
मनिं काय योजिलें तूं ?

चाल बदलून—हें उसळे जळ सळसळा। ग सळसळा।
हे तुषार मोतीं गळां। घालुनि गळां।
कधिं नेसुनि शालू निळा, हिरवा निळा।
मन हरतें, तनु बावरते, सरिते! तुझें शुभचि चिंतू
परि सांग तुझा हेतू ॥ १ ॥
ही ओढ कशाची? गोड जिवाला जोड, शोधिसी तूं?
मज सांग तुझा हेतू
मार्गांत उधळिलीं फुलें, कुणी वाहिले हार तंतू
वद नेशि कुठें ते तूं?
चाल बदलून :—कधिं कलरव तव मंजुळ। ग मंजुळ
कधिं खळ्बळ उरिं वादळ। ग वादळ
स्थिर उरीं न सुम वा दळ। सुम वादळ।
करि जादुगिरी कोण तें मुग्ध जाणते अज्ञ जंतू।
मज सांग तुझा हेतू ॥ २ ॥
फुंफाट करी नागीण, पाहि डिवचून कुणी हंतूं
तशि तुफान होशी तूं ॥
जणुं विनयवतीचा विनयभंग, बेढंग बघुनि दंतू
अधरोष्ठिं रोंविशी तूं ॥
चाल :— मानिनी ग स्वमनीं झणी रागेजुनी
चालली, प्रियावर कुणी जशी कामिनी।
स्वामीवर रुसली जशी हृदयस्वामिनी
नच मागें वळसी जरा, चाललिस त्वरा करुनि कां तूं ॥
मज सांग तुझा हेतू ॥ ३ ॥

# २२ माझी संपदा

[ ओंव्या ]

सयांनो ! नका गडे । अशा हिणावून पाहूं ।
वापुडा गणी तुम्हां । माझ्या मनांतला भावू ॥
पटकूर माझें थिटे । लाजवील शालू शेले
पदराच्या खालीं याच । माझे हिरे मी झांकीले !
प्रभा फाकतां ग यांची । थोर थोर दीपतील
एक एक तेजाळतां । सारे वाहवा गातील ॥ १ ॥

सयांनों ! नका गडे । लफ्फे तन्मणी दाखवूं
ताईत हे गळ्यांतलें । माझे मला बाई ! लाहूं !
यांचे मृदूलसे पाश । मला वाटती हवेसे
गळां गोड मिठ्या यांच्या । जादू न्यारी त्यांत वसे ॥ २ ॥

सयांनों लखलाभ । तुम्हां कानींच्या हिरकण्या
माझ्या संसार-नभांत । दोन चमकती चांदण्या
लुकलुक त्यांची बाई ! धीर देई माझ्या हृदा
आपत्तींच्या काळ्या रात्री । कंठील्या मी कितीकदां ॥ ३ ॥

सयांनों ! झणत्कारूं । नका हातींचीं कंकणें
रत्नजडीतें तीं पहा । शीर लववीती भेणें
सौभाग्याचे माझे चुडे । असो अभंग वज्राचे
मोतीं माणीकांची हाव । मला कधीं ना ग जाचे ॥ ४ ॥

फुलीं फुललें अंगण । गेंददार या तुळशी
मृदु मनाच्या कीं बाई । पावित्र्याच्या देती साक्षी

ठाख मोल संपदेचे। कसें गाऊं मुखीं पाढे
माझ्या मूक भावनांचे। गाती गाणारे पवाडे!
नको मान, जाहेराती। नका करूं गाजावाजा
नांवें बाळांचीं गाजतां। तोच लौकिक हो माझा
हिरे मोलीं चढतानां। ठाव शोधीती खाणीचे
असें वैभव हे न्यारें। गातां सार्थक वाणीचें।

## २३ सेवा!

[ अभंग ]

तुझ्या सेवेसाठीं। चंदनाची उंटी
परी नासापुरीं। अवघ्राण!
तुझ्या सेवेसाठी। गुच्छ आणीयेले
आधीं भूषवीलें। निज शीर्षा
तुझ्या सेवा नामें। आणिलीं पक्वान्नें
परी त्यांत मनें। उष्टावलीं!
तुझ्या सेवें धूप। दीप ओवाळिले
आधीं पाजळीलें। स्वतां भोंतीं!
तुझ्या सेवेसाठीं। आणिल्या अक्षता
खुपती त्या क्षतां। मनाचीया
तुझ्या सेवामिषें। जोडिले हस्तक
होवोनी हस्तक। अहंकारा!
देवा कशी करूं। विपरीत सेवा
ही तो अहंभावा। जोंजवण!!

# २४ सरस्वतीच्या दरबारांत—

अभिनयगीत

[ चाल :–फुलबाग फुले सारी ]

या वाङ्मय-कासारीं । फुलल्या मधु नवलहरी
दंवबिंदु तसे खुलती । नव कमळें मनहारी ॥ धृ ॥

कविता :– मी कविता गुणि बाला
नानाविध मम रूपकला
उन्मेष कटाक्षांनीं । तुज अळविन नित देवी ॥ १ ॥

लघुकथा :– लघुकथा सुविख्यात
मम प्रीति सान थोरांत
व्यापोनि जनमनें हीं । पूजीन तुला देवी ॥ २ ॥

नाट्यछटा :– मी नाट्यछटा हंसरी
हंसवीन जनास परोपरी
अवहेलुनि कुमतीते । कैवारिं सत्य देवी ॥ ३ ॥

रूपककथा :– } रूप कथा, लघुतम कथा
लघुतम कथा:– } आक्रमितों एकच पंथा
जरि सान, परी मोठें, सत्तत्व कथूं देवी ! ॥ ४ ॥

लघुनिबंध :– लघुनिबंध नाम मला
सहवासा मम जन भुलला
मम रूप सुबक सान । गुज कथिन तुला देवी ॥ ५ ॥

नाटक :– नाटक मी हो सानुलें
आवडतें बहु झालेलें
रमवून सान थोरां । प्रिय मीच तुला देवी ! ॥ ६ ॥

चुटका :- मी चुटका बहु नेटका
लावीन मनाते चटका
हंसवोनि जन मनें ही। तुज हंसविन नित देवी ॥ ७ ॥

सरस्वती :- प्रिय बाळें मम लाडकीं
आवडतीं मज सारखीं
रमवून रसज्ञांस। कार्य करा हितकारी ॥ ८ ॥

## २५ पाळणा

[ चाल :–रुणझुणु ये रुणझुणु ये....तांबे ]

निज सखये, निज छकुले, निज तूं लडिवाळे, निज राजस बाळे ।
खुळु खुळु खुळु खुळु खुळु खुळु वाजवीत वाळे ॥ धृ ॥

पालख बघ हलवीती
अपुल्या गृहिं नवयुवती
हालविती, खेळविती तुजला सुकुमारे ॥ निज सखये....॥ १ ॥

कुतुकें तुज नटवीती
आभरणीं नवरीतीं
काजळ नयनीं भरिती। घालिति पदिं वाळे ॥ निज सखये....॥ २ ॥

अरविंदाची शोभा
गृहिं खुलवी बघ प्रतिभा।
निशिगंधीं घे लाभा मन-मिलिंद बाळे। निज सखये...॥ ३ ॥

देइल तुज आनंदा
बाळपणींचा धंदा
सोनुकले सुख-निद्रा घेइं सांज वेळे ॥ निज सखये...॥ ४ ॥

आलिस तूं जन्माला
देश मुक्त हा झाला
सार्थ करी जन्माला, शुभ शकून झाले । निज सखये...॥ ५ ॥

हो लक्ष्मी हो अरुणा
विजया हो घे करुणा
सिद्ध तशी होइ रणा । देश बाहि बाळे । निज सखये....॥ ६ ॥

नाम तुझें मधु सुषमा
वाढवुनी गृह सुषमा
सार्थक आणी नामा । आशिष मनिं खेळें ॥ निज सखये...॥ ७ ॥

## २६ रंजित राधा

( अभिनय गीत )

[ चाल :–तन-मन पे मनहरने रंग दियो डाल ]

तनुमनिं सखि । मनमोहनें रंग उडविला ॥ धृ ॥
गात सखा विपळिं पळाला । शालु फाटला, ग रंग उडविला
पिचकारी मी भरितां श्याम पळे वेगें ।
शीतल नयनेंच आग लावि जिवाला ॥
पाठीशीं लपुनि पुन्हां । सखे ग ! पाठीशीं लपुनि पुन्हां । हांसत सुटला ॥
ग रंग उडविला ॥ १ ॥

निवास

मी झालें कशी वेडिपिशी, ध्यास जिवाला
नयनीं खिळवून नयन प्राण पळविला
मुरलीच्या मधुररवें, सखे ग ! मुरलीच्या मधुर रवें जीव मोहिला।
रंग उडविला ॥ २ ॥

करतलींच राहि रंग, भान नसें मातें
फासुनि रंगास लाल करित मुखाला
श्रीरंगें हाय ! सखे ! श्रीरंगें श्रीरंगें श्रीरंगें खचितवाइं ! गर्व हरविला
रंग उडविला ॥ ३ ॥

## २७ देवा ! तुझ्या कृपेवीण....

[ चाल :-तुझी रातराणी माझ्या....गिरीश ]

देवा ! तुझ्या कृपेवीण शीण हो संसारीं ॥ धृ ॥

विकल अपुऱ्या जळीं ।
जिवाची रे ही मासोळी ।
तडफडे, लागे गळीं
नेली नेली ! हाय ! दैवें जाळियामाझारीं ॥ १ ॥

धेनु चारा पाण्यावीण
वाया गेली, झाला शीण
दैवें केली वरी ताण !
थरकांपवी जीवा रे खाटीकाची दोरी ॥ २ ॥

व्याधें घेरियेली एणी
भीर भीर धांवे वनीं
दैवें नेमकी आणोनी
सोडिलीसे कैशी आतां वणव्याचें दारीं ।। ३ ।।

लागे पाठीला ससाणा
धांवतां पुरी हो दैना
वृक्षिं विसावा घेतानां
विंधिलीच पक्षिणी ही पारध्यानें उरीं ।। ४ ।।

राहो मुखीं तुझें नाम
देवा जातां जातां प्राण
नुरलें रे आतां त्राण
अंत किती पाहशील, आणि कोठवेरी ? ।। ५ ।।

## २८ सृष्टीचें सौंदर्यदर्शन

[ चाल :–ध्याहो ध्याहो सुरा ही सुगंधा–विद्याहरण ]

चला सखयांनों रमत गमत जाऊं, सृष्टि देवि पाहूं, तिजसि गीत गाऽऽऽऊं ।। ध्रु ।।

केलि लीलया
करु सर्लालिं या
गडे, हंसत हंसत या । रमुनि जाऊं ।। चला....।। १ ।।

शिरुनि उपवनीं
सुमन विकसनीं
जरा नयनिं निरखुनी । गीत गाऽऽऽऊं ।। चला....।। २ ।।

कुंज कूजनीं
कोकिला वनीं
कुहूं कुहुं निनादुनी । साथ देऽऽऽऊं ॥ चला...॥ ३ ॥

पक्षि सुस्वरें
गाति मुदभरें
सर्वे नादती झरे, कान देऽऽऽऊं ॥ चला....॥ ४ ॥

भोजना कुणी
अणिति सुगरणी
रसास्वाद घेउनी–चला सेऽऽऽवूं ॥ चला....॥ ५ ॥

जीवनांगणीं
ध्येय चांदणी
प्रकाशास घेउनी, गृहीं जाऽऽऽऊं ॥ चला....॥ ६ ॥

## २९ भारत मातेस अष्टांग वंदन

( अभिनय गीत )

भारत माते ! वंदन पायीं ॥ धृ ॥

शुभ समयिं वाहुं माला ही
उत्तर भारतिया अम्हि बाला
शौर्यानें वाहू शिरकमला
दिव्य 'जवाहिर' दिधलें मुगुटा
राजेंद्रा शिरिंच्या या थाटा ॥ १ ॥

महाराष्ट्र कन्या तव आई !
उजळिति ज्योत स्वाभिमानी ही
कुंकुम 'तिलकें' उजळित भाल
नवनामें ये उदया 'बाळ' ॥ २ ॥

गुर्जर देशाची तव पुत्री
'मोहन' मंत्रें डुलवि धरित्री
अखिल जगीं तव सुनाम होवो
शांति निरामय भारत लाहो ॥ ३ ॥

सुबुद्ध तनया अंबे ! येई
नूपुर झंकारें दे ग्वाही
निर्मोनी 'राजाजी' यांस
महती दिधली तुजला खास ॥ ४ ॥

वंग वासि आम्ही तव बाला
घेउनि आलों नैवेद्याला
वाहुनि 'नेताजी' पदकमलां
तोषविलें ना देवी ! तुजला ॥ ५ ॥

कर्नाटक कन्या ही येई
सिंह गर्जना जणूं ऐकवी
'गंगाधर' 'राधाकृष्णास'
निर्मित दिवाकराचा भास ॥ ६ ॥

तैलंगणवासी ही तनया
लागतसे माते ! तव पायां
बुद्धिमंत रत्नांची खाण
तुझिया विभवास्तव ही जाण ॥७॥

वंदन अष्टांगांनीं जननी
करितों कन्या तुझिया चरणीं
विजया, लक्ष्मी, सरोजिनी या
अरुणा कमला नव यो उदया ॥८॥

## ३० उपेक्षित ऊर्मिला

( शंकरा )

(समूहगीत) :–ऐका अभिनव करुण कथा । रसिका निवाड द्या आतां ॥धृ०॥
रघुपति वनवासा निघतां । अंतःपुरीं शिरे चिंता
ग्रासिलें कुणा कुणांस तिनें । साहिलें दुःख कुण्या सतिनें
करुणास्पद अंतर कैचें– । भोगितें हठवच कैकइचें !
परिसा अभिनव करुण कथा । रसिक हो निवाड द्या आतां ॥

( वृत्त पृथ्वी–यमन )

राम :-करांजुलि जुळे, लवें शिर गुरो ! पदीं बंदना
तुम्हींच गुरुजी ! अतां रघुकुला खरे वंद्य ना ?
वसिष्ठमुनि ! द्या निरोप, निरवी तुम्हां राम हा
गृहा, निजकुला, प्रिया मम पुरी अयोध्या महा ॥

( जाति हरिभगिनी–बागेश्री )

लक्ष्मण :–कुठें चालला प्रिय बंधो ! तूं रघुकुलतिलका ! श्रीरामा !
एक चालतां पद, दुसरा तो घेइल कैसा आरामा ?
सुगंध जिकडे भ्रमरहि तिकडे जाइ व कां वेडावुनियां ?
एक नयन मीलित होतां कां राहिल दुसरा स्थिर वायां ?
सर्वेचि न्यावें लक्ष्मणास या दया करावी रघुराया
निरोप द्यावा आम्हां उभयां, आशीर्वच द्या मुनिवर्या ! ॥

( वृत्त तोटक मालकौंस )

सीता :–प्राण जातां काय नाथा ! राहते मागें कुडी !
सूत्र तोडा तरिहि जाइल वायुसंगें बावडी
जीवना कंटू कशी हो । सह्य ना विरहव्यथा
साउलीसम पाउलीं तव चालुं दे सीता अतां ॥

( पिलु )

राम :–जनक कुमरि ! तूं कुसुम कोमला रुततिल कंटक वनमार्गी
श्वापद भयकर बघुनि थरकशिल फिर मागें सखि ! फिर मागें !
येणारचि तर येइं, परी घे मातृजनांचे आशीश
निरोप घेई अंतःपुरिंचा, सकलांना जाऊनि पूस ॥

( वृत्त हरिणी बागेश्री )

सीता :–मजवरि दया सासूबाई ! तुम्हीं सदया करा ।
खचित वनवासा मी मानीं कृपा अथवा बरा ॥
सहमज पती भाऊजीही कशास वृथा व्यथा ।
कटुतम शतां दु खां भी ना स्नुषा तुमची अतां ॥

( वृत्त हरिभगिनी-बागेश्री )

श्रुतकीर्ति, मांडवी ! ऊर्मिलाबाई ! नका करुं मुळिं चिंता ।
सेवा अंतरली मज, गुरुजन सेवावे तुम्हीं आतां ॥
रघुकुल महिमा निज आचारें करा जतन पुरि आयोध्या ।
निरोप द्यावा अभागिनीला वनवासी झालें सध्यां ॥
आशीर्वच द्या गुरुजी ! आम्हां, पौरजन ! अतां जा मागें ।
कृपालोभ राहुं द्या, जानकी वरदानातें या मागें ॥

( वृत्त शा. वि.-वसंत )

(समूहगीत):-चाले राम पुढें, मध्यें जनकजा, मागें तया लक्ष्मण
हाले ना तरुपर्ण, वाहि जल ना, उद्विग्न सारें वन !
चिंताक्रांत पुरी पुरी, धवल तो प्रासाद दुःखें महा
चिंताग्नींत पुरी जळे मुकुलिका ही कोण यथें पहा

( बिलास खानी तोडी )

ऊर्मिला : जीवनाचे ओघ जुळले जावया ऐसे दुरीं !
दो हृदांचें ऐक्य झालें तोंच फिरली कां सुरी ?
समजूत कैची ? नाथ गेले बोलतां ना सांगतां !
एक झाल्या दो मनांची हीच कां हो ! सांगतां ! !
दोन पक्षी एक वृक्षी बैसती ना बैसती
तोंच दोघां दो दिशांना हांकली कुणि दुर्मति !
मेघमाला दुःखिता ही वातचक्रें पांगतां
एक झाल्या दो मनांची हीच कां हो ! सांगता ! !

( चाल :–मुद्रिके अग चरपते........ (कालिंगडा )

ऊर्मिलेची सखी :–ऊर्मिले ! सखे किति अशी जीवा शिणविसी पदहि तेवी
समजावुं तुला कैंवी ।

ना घोट जलाचा, ओठ सुके ग, पोट भुकें राही ।
घे फलाहार कांहीं

रत्नहार खुलतो फार, हरितदलभार, धरीं देहीं
कुसुमें नव अणिलीं हीं

नच ढाळिं अश्रू मुसुमुसून, नेत्र पुसुपुसून होति लाल
किति मलिन होति गाल

शृंगारसाज घालितां मनाची व्यथा उणावेल
परिस सारिका बोल ।

( जाति हरिभगिनी–जोगिया )

उद्विग्नावस्थेंत
ऊर्मिला :–काय करूं मी हाय ! जिवा ! ! मज पाय पतीचें अंतरले !
नित्य तयांची सेवा घडतां भवसागर असतें तरलें ! !
किति नामाची जपत मालिका राहुं पाहुं कशि साहुं व्यथा ?
सुख कसलें ? सहवास न ह्यांचा दर्शनही ना दुरुनि अतां !
चंद्राविण तारका, सारिका शुकाविना ती कशि शोभे ?
जातिलता आम्रातें किंवा कविता रसिकांसचि लोभे !
नलगे मजला रत्नहार, दे फेकुनि सुमनें वा माल्य
सुगंध गेला हृत्पुष्पांसह उरलें केवळ निर्माल्य ।
वनवासी जानकी म्हणे जग ! राहि ऊर्मिला प्रासादीं !
सखे ! जाळि परी हृदयव्यथा मज, दर्शन त्यांचें घडे कधीं ?

## ३१. असा धन्य उद्गार वाचेस यावा !

[ बडोदें येथें, गुरुपौर्णिमेनिमित्त, श्री. गुरुवर्य माणिकराव यांच्या व्यायामशाळेंत प्रतिवर्षी जो अपूर्व सुखसोहळा नेत्रांस आनंद देतो तो पाहून त्यादिवशीं अंतःकरणांतून उमटलेले धन्योद्गार. ]

( वृत्त - भुजंगप्रयात )

अहो भाग्य ! धन्या गिरा आज होई
वपू हर्ष रोमांचिता दर्शनें ही
असा सोहळा जन्मजन्मीं दिसावा
असा पाठिराखा समस्तां असावा ! ॥ १ ॥

शिशू अर्भकें नित्य क्रीडावयाते ।
इथें धांवती सोडुनीया गृहाते ।
समुत्कंठ ऐकावयाते ' वहावा ' !
असा बालप्रेमी समस्तां असावा । ॥ २ ॥

किशोरांचिया मानसीं एक आस ।
" कसें तोषवूं 'भाऊ'सी " हाच ध्यास ।
कुणांही कदां रोष यांचा नसावा
असा थोर शास्ता समस्तां असावा ॥ ॥ ३ ॥

गुरु आणि व्यायामशाळाच एक ।
युवे 'भाऊ' चे मानिती जीवनैक्य
भया, आमया, देति चिंते न ठावा
असा थोर आरोग्यदाता असावा ॥ ॥ ४ ॥

किती बालिका आर्यकन्या स्वसाही
तयां अर्पिती भावसर्वस्व कांहीं

जसा कृष्ण कृष्णेप्रती हो विसांवा
असा पाठिराखा सुबंधू असावा ॥ ॥ ५ ॥

किती मित्रप्रेमी किती भाग्यवंत ।
कुणी वृद्ध धीमंत श्रीमंत संत ।
इथें लोभती भृंग पुष्पा जसें वा ।
असा एक सन्मित्र सर्वां असावा ॥ ॥ ६ ॥

चमत्कार ! हो ! [१] चोर गुंडे नि डाकू
जणों कीं " ययांचे प्रसादास चाखू "
म्हणोनीच येती प्रसंगीं लढाया
असा शक्तीमान् वज्रदेही असावा ॥ ॥ ७ ॥

गणेशोत्सवी ज्ञानसत्रानिमित्त ।
स्वयें मंगलेशेंहि यावें सुनित्य ।
शिवाजी प्रभू आदरी येथ सेवा ।
स्वयंसेवकीं एक ऐसाच व्हावा ! ॥ ८ ॥

व्रतें आचरोनी सुदीर्घ प्रयासें
जयें लोकसेवाहि केली सुहास्यें
तया रामही साह्य कैसा न व्हावा ?
असा पाठिराखा समस्तां असावा ॥ ॥ ९ ॥

बलोपासका या चिरंजीवनांत
हनूमंतजी ! ठेवि आरोग्यवंत
कृपेच्या कटाक्षें जयातें पहावा
असा भक्त कैसा चिरायू न व्हावा ! ॥ १० ॥

---

१ एकदां कांहीं अट्टल दरोडेखोराशीं भाऊंना दोन हात करावें लागले व तेव्हां भाऊंनीं त्याचें सांधे उखडून त्यांना नामोहरम केले.

[2]कलीकालही कापला भीतिनें या
तसे आधिव्याधीहि जाती स्वगेहा
[3]जरा ही वदे "ना गमें येथ ठावा !"
असा वज्रदेही सुखी नित्य व्हावा ।। ॥ ११ ॥

पिता भीष्म वा आमुचा थोर बंधू
तया नम्रशीर्षें कशी मी न वंदूं ?
असे फांकली 'माणिकांची' प्रभा वा
'यशोवंत' तो धन्य कैसा न व्हावा ! ॥ १२ ॥

अहो ! लेकरूं मी करूं काय गीति
जयाच्या गुणांना मिती ना कशी ती
कसा दीप दावील सूर्यप्रभावा ?
असा लोकवीराग्रणी नित्य व्हावा ॥ ॥ १३ ॥

बडोद्याचिया भूषणांचें ललाम
कुणीही पुसा, धन्य तें धन्य नाम ! ॥
गुरु बाप बंधु असा भक्त व्हावा
असा घोष सर्वांमुखी नित्य यावा ॥ ॥ १४ ॥

सहस्रायु 'भाऊ' असावें तुम्ही ! हो
सहस्रावधी शिष्य घेवोंत लाहों
सुधन्या 'सुपत्रप्रसू ही रसा' वा
असा धन्य उद्गार वाचेस यावा ॥ १५ ॥

—सौ. अपर्णा देशपांडे

---

२ नुकतेच मोठ्या दुखण्यांतून भाऊ सुखरूप पार पडले.

३ भाऊंची मान सदा हालत असते जणूं म्हातारपण म्हणते "येथें मला बरें वाटत नाहीं. नको नको."

# ३२. सखे ! देतसे इशारा

गाई घराला निघाल्या । घण घण घंटानाद
बोहल्यावरील तुला । सखे देतसे मी साद ।।

हृदयाचें केलें खुलें । सल तुला जें सललें
सानुभुतीच्या कंपनें । नयन हे ओलावले
कशी आश्वासूं तुला मी । तुझी फिर्याद रोकडी
परी स्मृतींच्या कपाटा ! आतां घट्ट लावी कडी ।।

जरी होऊं नये, झालें–पुढें टाकिसी पाऊल ?
क्षण वाटे जड भारी–नवी ऐकावी चाहूल
सात पावलें टाकितां–सख्य होई सन्मित्राचें
देशांतराला जाईल दुजाभाव, मानों साचें ।।

मुंडावळी पुसे आसूं । तीच शिकविल हासूं
चुकलेल्या राधिकेला । पहा लागली आश्वासूं
याचें रंगरूप नवें । परी गवसेल तोच
एकनिष्ठेच्या दर्पणीं । जरी पाहशील साच ।।

आसवांच्या जाईजुई–नवा घेतील तजेला
नवा गुलाब माळून–जरी हृद्भाव शिंपीला
जंगलांतही मंगल । उभविती आर्यकन्या
जादूची जीवनकला । साधली ना कुणा ' अन्या ' ।।

भरलेल्या मंडपांत । शुभाशुभांचा कल्लोल
नको उभवूं मनांत । घोर नमीं बुडवील ।
झाला अंत:पट दूर । दूर सारावें नैराश्य
नवें कल्पोनी जीवन । मुखावरी आणीं हास्य ।।

स्मृति उफाळली जरी । गांजील पिशाच्ची परी
इच्छाशक्तीची फुंकर । घालूनीया कर दूरी
वेळेवारी नावरीतां । झडपील ती अमाप
वेध घेईल अचूक । वंचनेचें शिरीं पाप !

मनराजा पाही मनीं । पुढें उभा तोच मान
तोच माला गळां घाली । पुढें झुकवावी मान
अश्रू सरी झरझरा । आल्या जरी नयनांत
टाकी किल्मीष धुवोनी । त्याच वाहत्या गंगेत ॥

रानोमाळ भटकोनी । प्रीत येईल माघारीं
जिचा वास हृदयांत । तीच नांदेल या घरीं
चरावया गेलेल्या त्या । गाई येतात ना घरां
घण घण घंटानाद । हाच देतसे इशारा !

ग्रंथ संग्रहालय
क्रमांक
१२४८
प्रत

## ३३. नवकाव्य-कन्या आणि मातेचें मनोगत

नवकाव्यकन्या बाई । पोर उफाड्याची झाली ।
अंग अंगीं हिच्या ज्वानी । पहा उभारीला आली
जरी पोटची ही पोर । हिचा अवखळपणा ।
माय माउलीच्या हृदीं । घोर लावूं लागला ना !
बुद्धिमंत पोर बाई । वाटे कौतुक करावें
परी शिरजोर होतां । मायें अधोमूख व्हावें !
म्हणे "सत्य तें बोलेन" म्हण "सत्य तें लिहीन"
"परमेशें जैशी केली । तैशीच नाचूं लागेन

नको मला परिवेश । नको वस्त्रहि थोडेंसें :
नसतानां मला वस्त्र । नाचेन मी हवें तसें ”
–आणि काय सांगूंबाई । हद्द झाली हिच्या पुढें
हिचें सौंदर्य वर्णीती । मिटक्यांनीं कुणी लाडें ।
काय तयांना मी सांगू । थोर नामवंत ज्ञात ।
त्यांच्या बुद्धीचें खंडन– । मला कैसें साधेल तें ?
साधी माय, प्रेमला मी । मला भलतें साधेना
ज्ञानदेव, तुका, चोखा, । माझे बाळ हे साधे ना !
नामदेव, एका, जनी । रामदास, वामन का
भक्त मयूर श्रीधर, । ‘केशवसुत’हि नवा ।
‘यशवंत’, गिरिश हे । माधवही उभयतां
मुख उजळीती माझें । कुसुमाग्रजादि आतां ।
तोंच जन्मलें हें रत्न ! । आणि काळोखी आगिली
अवनत मान झाली । अभिमानें उंचावली ॥
काय काय बकेल ही... । म्हणे ‘अंतर खोलतें’
कैसे आकळावें हिचें । बोलणें न समजे तें ।
उपचारें आवरीली । अळुमाळ समूजावीली
परी धीट दांडगी ही । अडदांड कीं हो झाली ।
हिची अनंगाची मस्ती । थोपवीतां थोपवेना ।
हिचे बेफाट वागणें । अंतराला झेंपवेना
परी मातेचें आंतडें । तिळ तिळ तुटूं लागे
तटा तटा तुटतात । हृदयाचे पहा धागे ।
–तुझें सौंदर्य उत्तान । घाल परीवेश कांहीं
पावित्र्याचें तेज मुखीं । आणि जरा येऊं देई

चंद्रकळा सभ्यतेची । नेस, वेश तो आगळा
मांगल्याचे, सौंदर्यांचें आणि कुंकू लाव भाळा ॥
चकाकत्या नेत्र तारा । खाली वरषो प्रकाश
चांदण्यांनीं उजळते । भूमि आणिक आकाश
शालीनतेचें लेणें । शोभा वियेला आणितें ।
स्त्रीचें सौंदर्यहि तेंच । खरें, बोलती जाणते ॥
नको मर्दपणा बाई । व्हाया विनीत तूं शीक ।
विनीतेला वानितात । संत सज्जन रसिक ॥
आणि ऐशा सौंदर्याचें । होईल जें गान शुद्ध
हर्षावेल माझें तरी । आज हृदय जें विद्ध ।

## ३४. त्रिवारधन्या लेखनि झाली [ जाति–नववधू ]

मन फुलतें, तन पुलकित होतें
आनंदें नीर नयनिं येतें ॥ ध्रु० ॥

तेजाळ अहो चरित्र अद्‌भुत
खडतर जीवन कंठि उदात्त !
काठिण्येंही झालें कुसुमित !
हें नवल कोण वर्णू शकतें । आनंदें नीर....॥ १ ॥

चौभावंडीं खुलला हीरक
ज्ञानीयांतहि सुतेज दीपक
योगबळीं योगीच अलौकिक
शिरभूषण माय मराठीतें । आनंदें नीर....॥ २ ॥

लोकोत्तर चारित्र्यें खुलला
अमृतवाणी मृदुल बोलला
आर्तांते संजीवन झाला
कीं सुखाचि मूर्त प्रकटे येथें । आनंदें नीर....॥ ३ ॥

नारायण बोलला 'नरा'स्तव
तेवि जणो तूं दलित-नरांस्तव
ज्ञान भक्तिचा संकर वास्तव
ध्वज भागवतांचा उंच इथें । आनंदें नीर....॥ ४ ॥

ज्ञानेश्वरिचें अमोल लेणें
महाराष्ट्र मिरवी अभिमानें
होईलचि असमान ठेंगणें
जग लववील माथें या पुढतें ॥ ५ ॥

धन्य मराठी मायमाउली
धन्य असा ज्ञानीसुत व्याली
त्रिवार धन्या लेखनि झाली
जी 'ज्ञानेश्वर अमुचा' लिहितें ॥ ६ ॥

वि श्रां ति.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6060

# नवीं मंगलगीतें

[ लग्न मुंज वगैरे मंगल कार्यांत म्हणण्याजोगीं नवीं गीतें ]

लोकोत्तर चारित्र्यें खुलला
अमृतवाणी मृदुल बोलला
आर्तांते संजीवन झाला
कीं सुखाचि मूर्त प्रकटे येथें । आनंदें नीर....॥ ३ ॥

नारायण बोलला 'नरा'स्तव
तेंवि जणो तूं दलित-नरांस्तव
ज्ञान भक्तिचा संकर वास्तव
ध्वज भागवतांचा उंच इथें । आनंदें नीर....॥ ४ ॥

ज्ञानेश्वरिचें अमोल लेणें
महाराष्ट्र मिरवी अभिमानें
होईलचि अस्मान ठेंगणें
जग लवविल माथें या पुढतें ॥ ५ ॥

धन्य मराठी मायमाउली
धन्य असा ज्ञानीसुत व्याली
त्रिवार धन्या लेखनि झाली
जी 'ज्ञानेश्वर अमुचा' लिहितें ॥ ६ ॥

वि श्रां ति.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6060

# नवीं मंगलगीतें

[ लग्न मुंज वगैरे मंगल कार्यांत म्हणण्याजोगीं नवीं गीतें ]

दा. क्र. ८०८०
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# १ घाणा भरणी

[ हा विधि आजकाल पुष्कळ ठिकाणीं टाळण्यांत येतो वास्तविक तसें होऊं नये. या विधीचा मूळ उद्देश अत्यंत सुंदर व भावभक्तिमय आहे. कार्य म्हटलें कीं आप्तइष्ट हवेत. आप्तइष्ट म्हटले कीं त्यांना चार दिवस खाऊंजेऊं घालण्यासाठीं घरांत धान्यपुरवठा हवा. हा पुरवठा करण्यासाठीं विघ्ननाशक मंगलमूर्ति गजाननाचें भावभक्तिमय सामुदायिक आवाहन म्हणजेच घाणा. हें गीत म्हणत असतानां मुसळांस आवाजदार घुंगुरें बांधावीं म्हणजे गीतास लयबद्धता येऊन भोंवती गडबड करणारीं बालकें व स्त्रिया आपोआप आकर्षित होऊन शांत होतात व या मंगलविधीचें वातावरण शांत व मधुर राहतें. भगिनींनी ही नवी कल्पना जरूर रूढ करावी अशी विनंति आहे.

९५०० / २३।१०

( चाल :—एकसुरांत घुंगरूं बोल-जोडी बैलाची...इ. )

देवा गजाननाला आठवुनी । घाणा भरूं या चला साजणी ॥ धृ० ॥

ऋद्धि सिद्धीला आळवू चला । हस्त लागूं द्या अपुला भला
चाल बदलून :— धनधान्यांची पडो ना तुट
लावुं कार्यास मन एकजूट
उभा देवाजी मम अंगणीं । घाणा भरूं या चला साजणी ॥ १ ॥

आणा सुवासिनी हसमुखी । कुणी बोलावा सुभगा सखी
हातगुणाच्या बोलवा सया । पुत्रवंतीची असूं द्या छाया
कुलदैवत आठवा मनीं । हो आठवा मनीं
शुभ आशीर्वचा घेउनी । हो घेउनी
वर / वधु { बैसला शुभ लक्षणीं । घाणा भरूंया चला........ ॥ २ ॥

आतां कांडण कांडुया चला । पुजा जातीया आणि मूसळा
वरमायीची भरवा ओटी । लावा अक्षत शुभ ललाटीं
आप्त इष्टांचा जमवा मेळ
आतां लावा ग हळदी तेल
हास्य विनोद करूनी जनीं । घाणा भरूं या चला........ ॥ ३ ॥

रामरायाचा करा आठव । स्मरा स्मरा ग रमामाधव
सीतामाईला करा मंत्रणा । सवें आणावें हनुमंतांना
शुभकरें द्या मांडवा मेढ
करा पुण्याइची लागवड
ईश देईल फळ बहुगुणी । घाणा भरूंया चला........ ॥ ४ ॥

देवकृपेनें भरें कोठार । शोभें तोरणें मांडवदार
भावभक्तीनें देवदेवक । बैसवीतात माय जनक
इष्टमित्रांची जाहली दाटी
माया प्रेमाची लावुनी दिठी
सुख सोहळा पाहुं लोचनीं । घाणा भरूंया चला साजणी ॥ ५ ॥

## २ मंगलाष्टक [ व्रतबंधाचें ]

वंदोनी कुलदैवता गजमुखा बा ! अंतरीं त्यां स्तव ।
घेवोनी व्रतबंधना दृढमनें हो सिद्ध तूं त्यास्तव ॥
आले आप्त तुझे शुभाशिष जणूं हे वर्षिती अक्षत ।
त्यां योगें तव जीवनीं सुघटिका येतील अव्याहत ॥ १ ॥
आकांक्षा मनिं थोर ठेवुनि तुला बांधीत मूर्ध्नावली ।
सौवर्णी सुगुणी तशी चमकदी तीते पहा आणिली ॥

मौंजीबंधन साज तो चढविला वैशिष्ट्य हें त्यांतलें ।
' आहे ज्ञानहि कष्ट साध्य ' म्हणुनी हें सर्व तूं घातलें ॥ २ ॥

सन्नारी नटल्या मुलीं विनटल्या होती मनें मोदित ।
सानापासुनि थोर आप्तजन हे झाले सुसंमीलित ॥
माला, मंगल तोरणें विलसती आनंद कोंदाटला ।
मौंजीबंधन साधण्यास बटुचें तो मार्गही दाटला ॥ ३ ॥

बाळा ! शैशव संपलें, तव अतां विद्यार्जनाची दशा- ।
आली, भाग्य तुझें, समीप तुजला आदर्शही थोरसा ॥
गुर्वाज्ञा शिरसा धरीं, तनुमनीं राहीं सदा निर्मल ।
वाढे सत्वगुणें, प्रफुल्ल सुमनें, सद्वर्तनानें बल ॥ ४ ॥

वत्सा ! बाल्य तुझें अजून वदनीं रेंगाळतें मोहुनी ।
सारी कोमलता मुळीं न हलतां राही तुला वेंधुनी ॥
आहे प्राप्त परी नरास करणें तो आद्य विद्यार्थ, कीं ।
नाना कष्टहि सोशिले गुरूघरीं श्रीरामकृष्णादिकीं ॥ ५ ॥

होई मंगल सुप्रभात गगनीं या हिंदभूच्या अतां ।
दारीं पाउल ठेविलेंच पहिलें स्वातंत्र्यसूर्यें स्वतां ॥
कर्तव्यार्घ्य तयास एकजुटिनें द्यावें पिढीनें नव्या ।
पाठोपाठ तुझ्यासमा कितितरी त्या बालमूर्ती हव्या ॥ ६ ॥

' विद्या हें पुरुषास रूप बरवें ' बा ! गर्जती 'पंडित' ।
ती नानाविध आज भूतलिं असें, होई तियें मंडित ॥
दृष्टी सन्निध घे विभूति तुजला आदर्श वाटेल जी ।
'नेताजी', 'तिलका', 'जवाहिर' तसे कीं वंद्य ते 'बापुजी' ॥ ७ ॥

राष्ट्रोद्धारणिं होइं बद्धकटि तूं राष्ट्रध्वजा दंड घे।
सेवेची खुणगांठ बांधुनि अतां यज्ञोपवीता, निघे॥
देवो तो भरला कमंडलु तुझा आर्तास पाणी स्वयम्।
मौंजीबंधन सार्थ होइल तदा, भूयात् बटोर्मंगलम्॥ ८।

## ३ मंगलाष्टक [विवाहाचें]

हेरंबा! गणनायका! गजमुखा! सिद्धीश्वरा मोरया!
चित्तीं वास विनायका! तव असो भक्तांस दावी दया॥
दानां अन्य न मागतों, शुभ तुझें सन्नाम राहो मुखीं।
न द्रोहास करो कुणी जगतियां, धी राहुं दे संमुखीं॥ १॥

देवा! या सह ऋद्धिसिद्धि, वरदे! येईं सवें शारदे!
गाऊं नाम तुझें शुभास्पद असें वागीश्वरी! गे! मुदें॥
देईं स्फूर्ति, गुणांस गाउं जगतीं त्या मंगला कारणें।
वाग्देवीवर! येइं नित्य अमुचीं साधावया तोरणें॥ २॥

कन्या हें परकीय वित्त जननी पाळी, कळी कीं लता।
तीते, राहुनि दक्ष, नित्य जपुनी हर्षें सुसंवर्धिता॥
होतां प्राप्त सुयोग्य काल तिजला अर्पी वराते पिता।
जाणोनी अनुरूपता जन मुदें हे वर्षिती अक्षता॥ ३॥

वत्से! झालिस थोर, बाळपण तें गेलें त्यजोनी अतां।
नेत्रें हीं तव भावपूर्ण कथिती निःशब्द सारी कथा॥
खन्ती सोड परी, सुजोड तुजला गे! ही भली लाभली।
सारे आप्त कृतार्थ होत म्हणती ही सत्कुलां शोभली॥ ४॥

भाग्याचा दिन जीवनांत युवका! या मंगलीं येतसे।
लक्ष्मी सद्मसुहासिनी तव कुला भूषा वधू होतसे॥
चंद्राला जशि रोहिणी तव मना आनंददायी असो।
द्रव्यें दातृगुणा, यशें यशगुणा, साफल्य येथे वसो॥ ५॥

नांदी होत सुरू शुभावसरिं या संसारनाट्यांतली।
दावी मंगल अर्थ, सार शुभसें माळा गळां घातली॥
प्रेमाचेंच करीं अतां उभयतां बांधा खरें कंकण।
मंत्रार्था स्मरुनी मनीं, शुभदिनीं व्हा बद्ध दोघेंजण॥ ६॥

माला मंगल अर्पिल्या तनुमनें हें ऐक्य होवो खरें।
अन्योन्यास अतां खरीच समता, द्या साथ एकस्वरें॥
कौटुंबीं, कुळिं, राष्ट्रकार्यि कसुनी लावा पणा आत्मता।
कर्तव्यासचि जागतां, नर जिणें हो सार्थ हें तत्वतां॥ ७॥

सूत्रीं सत्सुम, कोंदणी हिरकणी, सत्कंठ वा सुस्वरा।
हंसा मौक्तिक, सत्कुलास महिमा, सत्कार्य किंवा करा॥
भाला कुंकुम, लोचनां सुख जसें, दुग्धास वा शर्करा।
झालें मीलन हें तसें, सुजनहो! भूयात् सदा मंगलम्॥ ८॥

# ४ मातृभोजन

[चाल:-अंगाइ गीत परिसुनी सखे हा...]

हा मातृ-भोजनीं पहा सयांनीं बाळ गडे बैसला॥ धृ०॥

वाजतात वाद्यें किती
चौघडे सनइ गर्जती
बैसल्या भव्य पंगती
जनांच्या मोद मना जाहला॥ हा मातृ...॥ १॥

रंगवल्लि चेतोहरी
काढुनी तियेचेवरी
रंग तेहि नानापरी
सर्वे या दीपावली लाविल्या ॥ हा मातृ...॥ २ ॥

पात्र तें रुप्याचें पुढें
सौवर्णवाटिका कडे
नवरस पक्वान्नें विडे
दक्षिणा विप्रां करीं अर्पिल्या ॥ हा मातृ...॥ ३ ॥

बैसुनी माय संमुखीं
घांस देइ पुत्रा मुखीं
या माय लेकरा सुखी
करो ती माता जगन्मंगला ॥ हा मातृ...॥ ४ ॥

## ५ विहिणीस

हिज बिहिणीबाई! सांभाळुनि घ्या अतां ।
भेद तोडुनी, स्नेह जोडुनी, समजा अपुली सुता ॥ धृ० ॥

ही लतिका लाविली आम्हि अपुल्या अंगणीं
तिज प्रेमजलाचें सिंचन नित शिंपुनी
साउली सुखाची वितरा संवर्धितां ॥ हिज...॥ १ ॥

ही ठेव अमोलिक अर्पण केली तुम्हां
तिज जतन करावी, वदणें नलगे अम्हां
पसरुनी सुकीर्ति प्रेमल अति म्हणवितां ॥ हिज...॥ २ ॥

हें पाडस हरिणीपासुनि दूरावतां
पाहिजेच त्याला सुमार्ग कुणि दाविता
आधार आपुला होइल बहु सुखविता ॥ हिज...॥ ३ ॥

अतिभाग्यें सहचर तोहि मिळाला गुणी
म्हणुनीच लेश चिंतेचा नच ये मनीं
परमेश चिरायू करो जगीं उभयतां ॥ हिज..॥ ४ ॥

## ६ व्याही मंडळीस

[ जातिः-शुभवदना ]

गोड घ्या करून आज भोजनास व्याही ! ॥ धृ० ॥

बेत असे बहु साधा, थाटमाट नाहीं
षड्रस पक्वान्नेंच नच, दूध भात साचा
लखलखाट नच कोठें रौप्य सुवर्णाचा
गोड मानुनी घ्यावी केवळ मधु वाचा
थोर मनें लवहि उणें मानुं नका काहीं ॥ गोड...॥ १ ॥

सद्भाग्यें उभय कुलां जोडिलें प्रभूनें
वधूवर अनुरूप चंद्र जेंवि कौमुदीनें
रत्ना बहु शोभा ये हेमकोंदणानें
वृक्ष वल्लरी विकसित प्रेमजलें होई ॥ गोड...॥ २ ॥

लग्नविधि संमेलन मिश्र भावनांचे
हांसु आसु एकसरें लोचनांत नाचें
मांगल्या वाढवितें स्निग्ध हृदय साचें
गोड गान, मानपान पूरक हें होई ॥ गोड...॥ ३ ॥

सुगुणखनी प्रियनंदिनी अर्पिली तुम्हांते
सांभाळा तिज लावुनि कन्येचें नाते
छत्र पित्यासम राहों अपुलें तिजवरते
गृहलक्ष्मी मांगल्या वाढवो सदा ही ॥ गोड...॥ ४ ॥

## ७ सूनमुख

[चाल:-नखा नखावर रंग भरा...]

सख्या सोयऱ्यांचा मेळा ग, जमवा, पाय चला उचला ॥ धृ० ॥

चंद्रज्योति उजळोनी सूनमुख शुभांगिचें या पाहुं चला ॥
कुंकुम रेखा मंगल जैसा, चंद्रकोर वा लावुं चिरी
नागिणीसमा वेणी घालुनि, जाळी सुमनांचीहि वरी
अलकाग्रांना बांधा बाई! घुंगुर रुमूझुम् गोंडे फुला ॥ १ ॥

चंदेरी वा महेश्वरीनें सडपातळ खुलवां बांधा
बाजुबंद हे छंद घालुनी बंध मेखलेचा बांधा
पाउल हस्तक, रोखुनि स्वस्तिक, नूपुर कंकणें घालू हिला ॥ २ ॥

कर्णभूषणें, चंद्रफूल, वा रत्नकुंडलें कानांत
काजळ कोरा, रंगहि गोरा, गालबोट द्या गालांत
मुंडावळिला कुंद कळ्या वा बकुळ, आणवा रम्य फुलां ॥ ३ ॥

जोडीनें ग खडीसाखरा मुखांत घाला शुभ वेळीं
मधुर हिचें मुख, मधुरहि वाणी, मधुसंगम मंगल काळीं
अमर करो या वधूवरांते ईश, हेच त्या मागूं चला ॥ ४ ॥

## ८ नववधूचें मनोगत

[चाल:-चंदनाची चोळी, माझं-अंग... ]

प्रीत थरारोनी माझें हारवीत भान हो हारवीत भान।
मायेला माहेराच्या नेत्रांत ये उधाण ॥ धृ ॥

हासूं नी आसूं बाई! करीतसे विव्हल।
उडते तारांबळ, पाहती हे सकळ
थांबवा नूपूरांनों! जराशी रुणझूण ॥ मायेला...॥ १ ॥

तातांची शिकवण, मातेची जपणूक।
चिमणी किलबील जाणवीते चुणूक
नाचरें बाल्य सरें, सुखाची जणुं खाण ॥ मायेला....॥ २ ॥

मंदारीं जीवनाच्या राहीन आई! सुखें
बोलके भाव आतां, झाले ग झाले मुके!
शीलाचा नंदादीप, दृष्टीला समाधान ॥ मायेला... ॥ ३ ॥

आवक १२६

## ९ घरभरणी

आली लक्ष्मी घरांत। ओवाळावं पीठ मीठ।
हलुवार ही मनाची। लागेल कीं धीट दीठ॥ १ ॥
घरभरणीला येई। सिद्धहस्त ही कमला।
भरा मोतीयांनीं ओटी। साडी चोळी घाला शेला॥ २ ॥
ऋद्धी सिद्धी घरा येई। हिच्या पुण्य पाऊलानीं।
झाकेल घर माझं। सोनीयांच्या कवलांनीं॥ ३ ॥

आली घरा सीतामाई । शोभे रामसीता जोडी ।
हिच्या पवित्र मनाची । साक्ष पटो घडोघडी ॥ ४ ॥

कुळवंताची ही बाळ । माझं उजळील कूळ ।
सत्यवानाची सावित्री । घालो ज्ञानवंता भूल ॥ ५ ॥

साधी भोळी राधाराणी । पोरां थोरां रमवील ।
मधु प्रीतीची बांसरी । संसारांत ऐकवील ॥ ६ ॥

माझी संसार साऊली । शीतलता देवो मला ।
गावू एकमुखें जन । धन्य संसार हा झाला ॥ ७ ॥

## १० मंगलारति

[ चाल:-आरती त्रिभुवन जनकाची... ]

आरती मंगलगौरीची । करूं या चिर सौभाग्याची ॥ धृ० ॥

ज्योति नवलाख अंतरीची । उजळुनी भावभक्ति साची
मंगळवार श्रावणींचा । नववधूजनां पर्वणीचा
नवनव्या तसा उमेदीचा । घमूघमे सुगंध मेंदीचा
जमवुनी नारी
घरोघरिं दारीं
मिळोनी सारी
हौस ही खरी ग भाग्याची । करूं या चिर सौभाग्याची ॥ १ ॥

बांधूं तोरण दारांत । तसे गौरिच्या मंदिरांत
जाति मालती बकुल आणा । मोगरा, पुष्पबाग दवणा

गुंफुनी हार
वेणी कळिदार
माल्य संभार
गडे आरास सुपुष्पांची । करूं या चिर सौभाग्याची ॥ २ ॥
दरवळे गुलाब चंपक हा । केवडा आवडिनेंच वहा
वहा तुलसी दुर्वांकूर । मनीं उभवूं आशांकूर
जोडुनी हात
चिरायु कांत
करो ही मात
मागणी एकमुखी साची । करूं या चिर सौभाग्याची ॥ ३ ॥
अक्षत मंगल वाहुनिया । लाहूं चिर जीवन पतिराया
वाहुनी हळदकुंकवाला । चिंतुं या औक्ष कुंकवाला
गौरि मंगले !
चित्त रंगलें
हृदय दंगलें
याचना सदा मंगलांची । करूंया सुख सौभाग्याची ॥ ४ ॥
कंकणें गळसर शुभवाण । वाहुनी मागुं चुडेदान
अगरू उदबत्तीचे ठायीं । दुरित-वासना जाळुं बाई
अंबिके ! शक्ति !
वसो मनि भक्ति
नसो आसक्ति
मीपणीं अहंता नसोची । करूं या चिर सौभाग्याची ॥ ५ ॥
कर्पुर अहंकार जाळूं । तोषवूं माय ही दयाळू
लावुनी नीरांजनिं नेत्र । ठेवुं ना चित्तहि अन्यत्र

तूंच जगतांत
माय कीं तात
पुरवुं मम हेत
अपर्णा शिव-मंगल याची । करूं या चिर सौभाग्याची ॥ ६ ॥

## ११ दोहद

[चाल: ही नार रूप सुंदरा...]

वदुनिया मोकळ्या मनें, सांग शोभने । काय जे होती ।
डोहाळे सखये! प्रियजन तव पुरवीति ॥ धृ० ॥

तुज शालु कुसुंबी भला, तसा जांभळा, शोभतो फार ।
कंचुकी केतकीवर्ण कीं हिरवी गार
कानांत रत्न कुंडलें, तुला मंगले! हवीं कां सांग
पुष्पांनीं नटवूं भांग कीं आंगोपांग?
कंकणें हरित लेवुनी गुणांची खनी तोषते काय?
कीं मेंदि रेखुनी तुझे रंगवूं पाय?
चाल बदलून— तुज काय हवें वाटते गं वाटतें?
तुज हृदीं प्रेम दाटते—कां दाटतें?
हे आसु नयनिंचे नयनीं कां आटतें-आटतें?
करुनिया हृदय मोकळें सांग कोमले! काय जे होती
डोहाळे सखये! प्रियजन तव पुरवीती ॥ १ ॥

पति म्हणे सांग साजणें, फुलें चांदणें, विहरणें रुचते?
कीं प्रवास, आवड नौका नयनीं वसते?

पुष्पांचा सौरभ हवा मोकळी हवा हवाई हौस ?
सखि बोल, पुरवितों बोल, ये अशी बैस ॥
मधु थंडगार माधुरी रसाची खरी चाखवूं काय ?
कीं शीतल विंझणवारा रुखवी काय ?
कां मौन सेवुनी अशी मनिं हांससी ?
कां लाडिक मधु बोलणें नच बोलसी
कां गंभिर वदनें काहिं गूढ सुचविशी ?
दिल्‌खुशी दिलाची तशी, सांग मानसीं काय जे होती
डोहाळे सखये प्रियजन तव पुरवीती ॥ २ ॥
मैत्रिणी जमुनिया कुणी, नेति उपवनीं वेचुनी वित्त ।
हिजसाठिं गावुनी गीत खुलविती चित्त ।
मग येई वन्सं त्रयी, दीरजावाहि पुरविती हौस
ये म्हणती काळी चंद्रकळा घे नेस ।
तुजसाठिं पहा आणिले आम्र जांभळे नारळे केळीं
पक्वान्नें नवविध नवरुचिचीं बघ केलीं
हांससी प्रेमले परि ऐसे परिमित
हें फुका लाजरें कशास मंदस्मित
गुज कांहिं गोडसें निभ्रांतीनें कथ
फुल्वुनी जिवाची कळी, हांस मोकळी, सांग जे होती
डोहाळे सखये ! प्रियजन तव पुरवीती ॥ ३ ॥
हे बंधु भगिनी हीं मनीं जाति हर्षुनी मधुर स्वप्नांत ।
लाडक्या ताइला बघण्या झटति सुखांत ।
पातली माय माउली, बोलली मुली ! सांग गे बाळे !
तुज काय वाटतें काय हवें वेल्हाळे ?

मग काय बोलली बाळा ऐका जन ।
कानांत साठवा बोल चित्त देउन ।
आर्य कन्यका ही हिचें सुसंस्कृत मन ।
हांसली पुन्हां बोलली, जरा गहिवरली, बोल मग घुमती
"डोहाळे माझे पुरवुं जगज्जननी ती ॥ ४ ॥

मन कसें, असो सुमनसें. धवलमृदु तसें निरामय माझें
कधिं करो न बाई! उगाच माझें माझें
गृह कसे! विलसलें जसें गोकुळ तसें आमुच साजो
धनधान्यपूर्ण गोधनें, सुयशही गाजो ।
दिर जावा नणदा कुणीहि शेजारिणी मैत्रिणी भगिनी
समभाव सदा वर्तावा माझे नयनीं ॥
सदनांत तोषतिल मामंजी भाउजी ।
प्रियतात हांसतिल सोडुनिया काळजी ।
सेवीन जन्मभर पूज्य सासुबाइसीं ।
कुलदीप होउनी दीपद्युतिनें प्रेम वाढविल गेहीं
मज पुत्र असा श्रीरामचंद्र प्रभु! देई" ॥ ५ ॥

## १२ अंगाई गीत

[ चाल :–धीरे धीरे हांर बादल धीरे........ ]

जोजो बाळा। जोजो, छकुल्या जोजो अंगाई
या जिवाच्या राजिवाला झोंप कां नाहीं? ॥ धृ० ॥
झोंपलें रे रान सारें । झोंपले तारे
नीज घेई विश्व तूझें, सानुल्या! सारें।
पाकळ्या मिटल्या कळ्या या झोंपतीं बाई! या जिवाच्या....॥ १ ॥

भोंवतालीं एक झाली सानुली सृष्टी । रे बाळा !
वेंधुनीया पाळणीया वेधिती दृष्टी । कां बाळा ?
बावरीं सुकुमार झालीं लोचनें बाई । या जिवाच्या....॥ २ ॥

राघुमैना खेळण्याला गुंफिल्या कोणी । या बाळा !
मोर रावे कोकिळा या हंस नी चिमणी ! ही बाळा !
दंग होतीं डोळुलीं तीं पाहण्या काहीं ? या जिवाच्या ॥ ३ ॥

सूर संगीतीं गुणी कां गुंगला माझा ? हा बाई
भाव भक्तीचा भुकेला राम का राजा । हा बाई
स्थीर होई नीर येई डोळियां पाही । या जिवाच्या....॥ ४ ॥

कौतुकाची का पित्याची साद ये कानीं ? रे बाळा !
माउलीची माय बोली येतसे ध्यानीं । कां बाळा ?
राजसाला कीं सुधेची जागवी घाई । या जिवाच्या...॥ ५ ॥

काय बाळा पायिं वाळा वाजतो छंदी
जावळांला झेपवेना बिज्वरा बिंदी ?
खुळखुळा हा या खुळयाला खूळ कां लावी ? ॥ ६ ॥

काय बाळा तुज अजोबा बोधिती भारी ?
बाळलेणें कीं अजीनें घातलें भारी ?
गोत मायेचें तुला कीं प्रेमला बाही ? या जिवाच्या ॥ ७ ॥

नीज आतां भाग्यवंता भाग्य हें येथे
आप्तरूपानें तुझ्ञ रे डोलवी तूंत
घे लुटोनी स्नेहवृष्टी आज जी होई । या जिवाच्या...॥ ८ ॥

REFBK-0008080
REFBK-0008080

# मंगल मनीषा....

आलें मंगल, गोड भाव कवनीं आराध्य ॐ, शारदा ।
झालें मंगल धन्य ! धन्य ! म्हणुनी मी प्रार्थिलें श्रीपदा ॥
होवों मंगल सर्वदा, सुख वसो गेहीं, मनीं वा जनीं ।
गाण्या मंगलगीत, मंगलपते ! या नित्य स्फूर्ती मनीं ॥

शुभं भवतु ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८०८०